मंगळवार, २३ मे २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२५४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • TUESDAY 23 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-254 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# न्यायालयाचे बीबीसीला समन्स

## माहितीपटामुळे न्यायव्यवस्था आणि पंतप्रधानांच्या प्रतिमेला धक्का : याचिकाकर्ते

आधुनिक केसरी

**नवी दिल्ली : दिल्ली उच्च न्यायालायने ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनला मानहानीच्या खटल्यात सोमवारी समन्स बजावले. बीबीसीने प्रसिद्ध केलेल्या माहितीपटामुळे भारतातील न्यायव्यवस्था आणि पंतप्रधानांच्या प्रतिमेला धक्का बसला आहे, असा दावा या याचिकाकर्त्यांनी केला होता. त्यावरून दिल्ली कोर्टाने बीबीसीला समन्स बजावला आहे. जस्टिस ऑन ट्रायल या गुजरातस्थित संस्थेने बीबीसीविरोधात दिल्ली उच्च न्यायालायत धाव घेतली होती. आता याप्रकरणाची पुढील सुनावणी सप्टेंबर महिन्यात होणार आहे. न्यायमूर्ती सचिन दत्ता यांच्यासमोर हे प्रकरण सुनावणीस होते.**





बीबीसीने 'India: The Modi Question' नावाने दोन भागात एक माहितीपट प्रदर्शित केला होता. हा माहितीपट कथितरित्या यूट्युबवरही रिलीज करण्यात आला होता, मात्र वाद उद्भवल्याने यूट्युबवरून तो काढण्यात आला. या सीरीजच्या सुरुवातीस माहिती देताना सांगण्यात आलं आहे की, भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारत मुस्लीम अल्पसंख्यांक यांच्यातील तणावावर एक नजर, २००२ च्या दंगलीतील त्यांच्या भूमिकेबद्दल दाव्यांचा तपास, ज्यामध्ये हजारो लोक मारले गेले. हा माहितीपट प्रदर्शित झाल्यानंतर देशभरात खळबळ माजली होती. भाजपासमर्थकांनी बीबीसीवर ताशेरे ओढले होते. तसंच, जगभरातील नेत्यांनीही बीबीसीच्या या माहितीपटावर आक्षेप घेतला होता. दरम्यान, बीबीसीचा हा माहितीपट कालांतराने युट्यूबवरून हटवण्यात आला. परंतु, हे प्रकरण कोर्टात पोहोचले. गुजरात येथील जस्टिस ऑन ट्रायल या संस्थेने या माहितीपटाविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. बीबीसीने प्रदर्शित केलेला India: The Modi Question हा माहितीपट भारताच्या न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणारा आहे. तसंच, यामुळे पंतप्रधानांची प्रतिमा मलिन होत आहे, असा दावा या याचिकेतून केला गेला. त्यामुळे याचिकाकर्त्यांनी केलेल्या आरोपांवर उत्तर देण्यासाठी न्यायालयने बीबीसीला समन्स बजावले आहे. बीबीसीच्या दोन भागांच्या माहितीपटामुळे न्यायव्यवस्थसह देशाची बदनामी झाल्याचा युक्तीवाद याचिकाकर्त्यांतर्फे ज्येष्ठ वकिल हरीश साळवे यांनी केला होता. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी सप्टेंबर महिन्यात होणार आहे. बीबीसी, विकिमीडिया फाऊंडेशन आणि इंटरनेट अर्काइव्ह यांच्याविरोधात भाजपा नेते विनयकुमार सिंग यांनी एका ट्रायल कोर्टात खेचले होते. याप्रकरणी मानहानीच्या दाव्यात कोर्टाने संबंधितांना समन्स बजावले आहे. तसंच, आरएएस, विश्व हिंदू परिषद संबंधित माहितीपट किंवा इतर कोणत्याही सामग्रीच्या प्रकाशनापासून रोखण्याची मागणी या याचिकेतून करण्यात आली आहे.

# सचिन तालेवार मध्य प्रदेश पश्चिम क्षेत्र विद्युत वितरण कंपनीच्या संचालकपदी

आधुनिक केसरी



**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता सचिन तालेवार यांची मध्य प्रदेश शासनाने मध्य प्रदेश पश्चिम क्षेत्र विद्युत वितरण कंपनीच्या संचालक (तांत्रिक) या पदी निवड झाली आहे. मंगळवारी इंदूर येथे ते पदभार स्वीकारणार आहेत. तालेवार हे 1997 मध्ये तत्कालिन विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून एचव्हीडीसी 500 केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्र चंद्रपूर येथे रुजू झाले. याच ठिकाणी पदोन्नतीनंतर सहाय्यक अभियंता म्हणून त्यांनी काम पाहिले. त्यानंतर सरळसेवा भरतीमध्ये तालेवार यांची 2006 ला कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली. 2016 मध्ये सरळसेवा भरतीत त्यांची अधीक्षक अभियंतापदी निवड झाली. लातूर येथे या पदावर त्यांनी काम केले. 2018 च्या सरळसेवा भरतीत श्री. तालेवार यांची मुख्य अभियंतापदी निवड झाली. पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून त्यांनी नोव्हेंबर-2022 पर्यंत तर छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून डिसेंबर-2022 ते मे-2023 पर्यंत त्यांनी यशस्वीरीत्या काम केले.

# गळ्यात मागणीचे फलक अडकवून शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षाने वेधले लक्ष




आधुनिक केसरी न्यूज

**दिंडोरी :** तालुक्यातील जानोरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकानी आपल्यावरील कार्यवाही टाळण्यासाठी चक्क शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षाची बनावट सहीचे निकाली काढण्याबाबतचे पत्र शिक्षण विभागाला देवून शासकीय कार्यवाहीत दिशाभूल करण्याचा गंभीर प्रकार केला असून शिक्षण विभागानेही या पत्राची दखल घेत बनावट पत्राच्या आधारे चौकशी थांबविल्याने एक अजब प्रकार दिंडोरी शिक्षण विभागाचा दिसून आला. या बनावट पत्र व सहीची चौकशी करुन संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमनाथ वतार यांनी गळ्यात मागणीचे फलक लावून तोंडाला काळी फित लावून निषेध व्यक्त करत कार्यवाहीची मागणी गटविकास अधिकाऱ्यांकडे केली आहे. 6 ऑगस्ट 2022 रोजी झालेल्या शालेय व्यवस्थापन समितीच्या मासिक बैठकीमध्ये संबंधित शिक्षकावर आरटीई 2009 च्या कायद्यानुसार कारवाई करण्याबाबतचा ठराव समंत झाला होता. सर्व सदस्यांनी तसेच पत्रही मुख्याध्यापकांना देवूनही वरिष्ठांना कळविल्याचे सूचना केली होती. त्यावरुन दि. 29 सप्टेंबर रोजी मुख्याध्यापकांनी पंचायत समिती शिक्षण विभागात सदर पत्र आणून दिले. त्यावर दि. 7 ऑक्टोबर रोजी शिक्षण विभागाकडून मुख्याध्यापकांना ठरावाचीही प्रत सादर करावे, अशी लेखी मागणी केली. त्यावर दि. 10 ऑक्टोबर रोजी आपण दिलेल्या दि. 29 सप्टेंबर रोजीच्या पत्रान्वये माझे समाधान झाल्याने हे पत्र निकाली काढावे, असे पत्र अध्यक्षाच्या बनावट सहीने देण्यात आले. त्या पत्रावर शालेय व्यवस्थापन समितीचा शिक्का असून सचिव या पदाची खाडोखोड करण्यात आली आहे. शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षाला याची माहिती मिळताच हा दाखला कुणी आणून दिला ? याबाबत लेखी मागणी करत त्या अर्जावरील हस्ताक्षराची पडताळणी करुन शालेय व्यवस्थापन समितीचा शिक्का कसा मिळविला ? की शिक्काही बनावट आहे, याची चौकशी करण्यात यावी व शासकीय कार्यालयाला बनावट माहिती पुरविल्याबद्दल संबंधित इसमावर शिक्षण विभागामार्फत फसवणूकीच्या गुन्ह्यांअंतर्गत फौजदारी दाखल करण्याची मागणी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षांनी केली होती. परंतू त्याची दखल घेतली न गेल्याने सोमनाथ वतार यांनी गळ्यात मागणीचा फलक घालुन निषेध व्यक्त केला.

झालेला प्रकार गंभीर असून त्याची दखल घेतली जाईल . संबंधित शिक्षण विभागाचे गटशिक्षणधिकाऱ्यांना याबाबत आदेश दिले जातील व ती कार्यवाही निपक्षपणे व जलदगतीने करण्यात येईल . शासकीय कार्यवाहीत अशा चुकीच्या पध्दतीने गैरप्रकार केला असेल तर त्यावर कायदेशिर कार्यवाही केली जाईल .

**नम्रता जगताप– गटविकास अधिकारी दिंडोरी**

शालेय व्यवस्थापन समितीने केलेल्या ठरावाला वेगळ्या पध्दतीने हाताळले गेले . शासकीय कार्यवाहीत शासनाची दिशाभूल करत माझ्या नावाचे बनावट पत्र बनवुन शिक्षण विभागाला सादर केले जाते आणि शिक्षण विभागही त्या बनावट पत्राच्या आधारे चौकशी थांबवते, हे नक्कीच संशयास्पद आहे . प्रशासनाचा अधिकार अध्यक्षाला केव्हा दिले हा देखील प्रश्न आहे . दोषींवर त्वरीत फौजदारी गुन्हे दाखल होवून असे प्रकार करण्याचे कुणी धाडस करणार नाही, अशी कार्यवाही अपेक्षित आहे .

**सोमनाथ वतार – अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती जानोरी**

# नाशकात ५००च्या नोटा छापण्याची जोरदार तयारी

आधुनिक केसरी न्यूज


**नाशिक :** २००० रुपयांच्या नोटा वितरण प्रणालीतून काढून टाकण्यात येणार असल्याने त्याच प्रमाणात आता ५०० रुपयांच्या नोटा युध्दपातळीवर उपलब्ध करण्याची तयारी सुरू झाली आहे. नाशिक रोडच्या चलार्थपत्र मुद्रणालयाला पुढील चार महिन्यांत ५०० रुपयांच्या २८० दशलक्ष नोटा छापून देण्याची सूचना करण्यात आली आहे. म्हणजे वर्षभरात ज्या नोटा मुद्रणालयाने छपाई करण्याचे लक्ष्य होते, त्यांची लवकर पूर्तता करावी लागणार आहे. त्यानंतर मुद्रणालयाकडे पुन्हा मागणी नोंदविली जाणार आहे.

निश्चलनीकरणानंतर दोन हजार रुपयांच्या नोटा बाजारात आल्या होत्या. या नोटांची छपाई रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुद्रणालयांमध्ये झाली होती. बंद होणाऱ्या २००० रुपयांच्या नोटा २३ मे ते ३० सप्टेंबर या कालावधीत बदलून घेता येणार आहे. आरबीआयने दोन हजार रुपयांच्या जेवढ्या नोटा वितरणात आणल्या, त्याच्या चारपट अधिक बदलताना ५०० रुपयांच्या नोटा लागतील. ही बाब लक्षात घेऊन भारत प्रतिभूती मुद्रणालय महामंडळाच्या अखत्यारीतील मुद्रणालयांकडे वर्षभरासाठी ५०० रुपयांच्या नोटांसंदर्भात नोंदविलल्या मागणीची लवकर पूर्तता करण्यास सांगण्यात आले आहे. या बाबतची माहिती प्रेस मजदूर संघाचे सरचिटणीस जगदीश गोडसे यांनी दिली. आरबीआयने २००० हजारच्या नोटा बंद करण्याचा घेतलेला निर्णय चलार्थपत्र मुद्रणालयास लाभदायक ठरला आहे. नाशिकरोड मुद्रणालयाला या वर्षात पाच हजार २०० दशलक्ष नोटा छपाईचे काम मिळाले आहे. या मुद्रणालयात दहा ते ५०० रुपयांपर्यंतच्या नोटांची छपाई होते. २००० रुपयांची नोट बदलताना मुख्यत्वे ५०० रुपयांच्या नोटा उपलब्ध केल्या जातील. त्यामुळे ५०० रुपयांच्या नोटांचे वार्षिक लक्ष्य चार महिन्यात पूर्ण करण्यास सांगण्यात आले आहे. ५०० रुपयांच्या नोटेसह इतरही नोटांना मागणी येणार आहे. २००० रुपयांची नोट बंद झाल्यामुळे मुद्रणालयास नोटा छपाईचे जादा काम मिळणार आहे.



आरबीआयने २००० हजारच्या नोटा बंद करण्याचा घेतलेला निर्णय चलार्थपत्र मुद्रणालयास लाभदायक ठरला आहे . नाशिकरोड मुद्रणालयाला या वर्षात पाच हजार २०० दशलक्ष नोटा छपाईचे काम मिळाले आहे . या मुद्रणालयात दहा ते ५०० रुपयांपर्यंतच्या नोटांची छपाई होते . २००० रुपयांची नोट बदलताना मुख्यत्वे ५०० रुपयांच्या नोटा उपलब्ध केल्या जातील . त्यामुळे ५०० रुपयांच्या नोटांचे वार्षिक लक्ष्य चार महिन्यात पूर्ण करण्यास सांगण्यात आले आहे . ५०० रुपयांच्या नोटेसह इतरही नोटांना मागणी येणार आहे . २००० रुपयांची नोट बंद झाल्यामुळे मुद्रणालयास नोटा छपाईचे जादा काम मिळणार आहे .






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

पण अशा खूप काही गोष्टी माझे मित्र झालेली पुस्तके मला नकळत शिकवून गेली. त्यांचे हे माझ्यावर अनंत उपकारच आहेत !
सुट्यांमध्ये मी शेतात, जंगलात भटकत असायचो. कडाक्याचं ऊन पडलेलं असायचं. त्याचवेळी शेतात विशाल पसरलेला आम्रवृक्ष आपले प्रचंड बाहू उंचावून मला त्याच्याकडे बोलवायचा. वसंत ऋतूत त्याला इतका सुंदर मोहर फुटायचा की त्या झाडानं जणू अलंकार परिधान केले आहेत असं वाटायचं. त्याचा तो धुंद सुवास मला मोहित करायचा. मी त्याच्या तळी छान विसावायचो. कधी त्याच्या अंगाखांद्यावर बागडायचो. तो मला कधी रागवायचा तर नाहीच पण प्रेमभराने मला आपली फळे खायला द्यायचा. चिंचेच्या झाडाला आलेली कोवळी फुले, कच्च्या पण गाभुळलेल्या चिंचा तोंडाला वेगळीच चव आणायच्या. बांधावर जाळीत बोरांची झाडे असायची. हा सगळा रानमेवा माझ्या कमालीचा आवडता. त्याने माझे खिसे भरलेले असायचो. तेव्हा त्या दृष्टीने मी श्रीमंतच असायचो. तेव्हा ही चिंचा, बोरं खाऊन कधी खोकला आला नाही की आजारी पडलो नाही. आजकालच्या जाहिरातीत सारखं अमुक एक घ्या आणि इम्युनिटी वाढवा असं सांगतात ना, तर आमची इम्युनिटी अशीच आपोआप या पदार्थांमुळे वाढत गेली. चिंचा, बोरं, कैऱ्या पडताना आम्ही कधी कधी झाडाला दगड मारायचो. ती फळं खाली पडायची. झाडं कधीच आमच्यावर रागावली नाहीत. लोकांनी दगड मारले तरी आपण गोड फळेच द्यावीत हे झाडं मला नकळत सांगून गेली. काही तासांसाठीच उमलणाऱ्या क्षणभंगुर आयुष्य असलेल्या फुलांनी आपल्या सुंदर रंगांनी आणि सुवासाने दुसऱ्यांना आनंदच द्यावा हे शिकवलं. कुणाच्या स्वागताला वापरा, देवाला वाहा किंवा माळेत ओवा, ती सारख्याच निर्विकारपणे तयार असायची. दोस्तांनो, निसर्गसारखा शिक्षक नाही. खूप वेगवेगळ्या पद्धतींनी न सांगता खूप काही शिकवत असतो. निसर्गातले फुलासारखे छोटे घटक सुद्धा कसं जगावं हे आपल्याला शिकवून जातात. मित्रांनो, जाता जाता मला एक जुनं गाणं आठवलं. ते किशोरकुमार यांनी गायिलेले आहे. फार सुंदर गाणं आहे. दूर गगन की छांवमे या चित्रपटात ते आहे. त्यातील नायक तुमच्यासारख्या अशाच एका छोट्या दोस्ताला म्हणतो आ चल के तुझे मैं लेके चलू इक ऐसे गगन के तले जहाँ गम भी न हो आंसू भी न हो बस प्यार ही प्यार पले इक ऐसे गगन के तले तेव्हा दोस्तांनो, सुटीत असंच काहीतरी करा. निसर्गाचा, खुल्या आकाशाचा आनंद घ्या. झाडं, प्राणी, पक्षी यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करा. आणि हो, जमलंच तर पुस्तकांचं बोट धरून त्यातील अनोख्या विश्वाची सफर करून या. तुम्हाला खूप खूप शुभेच्छा.

# चला एका अनोख्या सफरीवर...





# आनंदी पहाट

## बौद्धिक विकासाचा दृष्टीकोन असावा

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

जसजसे वय वाढत जाते, तसतसे शारीरिक, मानसिक, भावनिक पातळीवर खूप बदल होत जातात. वाढत्या वयात खरी गरज असते सुख संवादाची, त्यासाठी प्रत्येक व्यक्तीला समजून घ्यायची. एकीकडे शारीरिक दुखणी काहीवेळा सहन करावी लागत असतात, तर दुसरीकडे संवादाचा अभाव निर्माण होत जातो. त्या संवादाआभावी अनेक मानसिक आणि भावनिक पातळीवर संघर्ष सुरु होत जातो. काहीवेळा आपल्या आपापसातील संवादाची सुरुवातच विसंवादाने होत असल्याचे दिसून येते. विचारांचा अभाव हे खरे तर त्यामागचे मूळ कारण असते. संवादाचा अभाव हे माणसांमाणसांत दुरावा निर्माण होण्याचे एक महत्वाचे कारण असते. ह्यामध्ये अनेकदा आचारांपेक्षा विचारांना महत्व आणि प्राधान्य कमी दिले जात असते. विवेकी विचार न करताच आचरण केले जाते, कृती केली जाते; काहीवेळा ती तापदायक, घातक ठरू शकते. क्रोध, संताप, मानसिक असमतोल, अपयश, नैराश्य या बाबींचा मनावर विपरीत परिणाम झालेली अनेक उदाहरणे आपल्याला बघायला मिळत आहेत. काहीजणांच्या बाबतीत तो परिणाम आयुष्यभर प्रत्येक गोष्टीवर झाल्याचे दिसून येते. लहानपणापासूनच प्रत्येक व्यक्तीच्या भावनिक, मानसिक आणि बौद्धिक विकासाच्या दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करणे जरुरीचे असते, हे समजून घेतले पाहिजे. जन्माला येणाऱ्या प्रत्येक जीवाला भावना असतातच. त्या भावना समजून घेऊन त्या व्यक्तीचे अंतर्मन अबाधित ठेवणे हे केवळ कर्तव्य म्हणून नाही, तर नैतिक जबाबदारी म्हणून सांभाळले पाहिजे. उपक्रमशीलता हा आपल्या शिक्षण व्यवस्थेतील महत्वाचा घटक असल्याचे मानले जाते. त्यांत नित्य नवीन बदल होणे अभिप्रेत असते. कारण योग्य बदल हाच विकासाचा पाया असतो. अनकेदा ह्या बदलाबद्दलच आपण अनभिज्ञ अथवा गाफील असतो.



आधुनिक केसरी

**यातनेच्या ठायी | तूच दिसे ||**
लचके तोडिती | मानवी श्वापदे ||
भक्ताची येऊ दे | किव थोडी ||१||
अपार सोसले | कष्ट जयासाठी ||
सांग तयापाठी | कोण आज ? ||२||
बरी नव्हे वेड्या | सज्जनांची थट्टा ||
लाविते रे बट्टा | कुळामाजी||३||
ज्ञाना संगे खेळ | खेळू नको दैवा ||
अंतरीचा धावा | ऐके विठु ||४||
ठेविन गे माये | भाव तुझ्या पायी ||
यातनेच्या ठायी | तूच दिसे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

अशुभादशिवाच्चापि पाहि मां
जगदम्बिके|
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं
नमाम्यहम्|| ६ ||
हे जगदंबिके, तू माझे अशुभापासून, अशिवापासून म्हणजे अपवित्रापासून रक्षण कर. मी तुला दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सृष्टि में देख विचित्रता, कर्म है कारण सोय ।
संचित अरु क्रियमाण है, प्रारब्ध क्रिय होय ।।४९।।(स्वर्वेद पंचम मण्डल द्वादश अध्याय) ०५/१२/४९
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
सृष्टीच्या विचित्रतेचे म्हणजेच विविधतेचे कारण कर्म आहे. संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण असे तीन प्रकारचे कर्म असतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# वेदांचा अभ्यास का करायचा!

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

पण थोडक्यात रामजन्म,गोपाळकृष्ण जन्म,दत्तजयंती,गीताजयंती,दशावतारातील दहा लोकमान्य जयंत्या ऊदा, वराह,मत्स्य, कुर्म या सर्व जयंत्या या आज 2023 साल उजाडले तरी मोठ्या प्रमाणात साजरे होत आहेत. भागवत धर्माची भक्तिची ही पताका आजच्या विज्ञानयुगातही अखंड तेवत आहे ही पुराणाचीच यशोगाथा आहे. वेद,व्यास ऋषी मुनींनी घालून दिलेल्या विद्येच्या आवरणात आपण सर्व जण सुखाने जगत आहोत.ऊदा स्वच्छता, जैनमुनी सतत तोंडाला व नाकाला फडकं बांधतात त्याला आता करोनामुळे मास्क हे नामकरण केलं नाही का ? नुकतीच करोनाची महामारी आली संपूर्ण जग हवालदिल झाले.कुणी वाचवली ही मानवजात !यात पुराणकालीन घालून दिलेल्या स्वच्छता,टापटीप यांचाही समावेश आहे. आता तरी "पुराणातली वांगी पुराणात ठेवा" हे उपहासात्मक वाक्य कुणी म्हणण्याचं धाडस कुणी करू नये. आणि करणारही नाही असा मला विश्वास वाटतो.पारमार्थाचा विचार सतत जागृत असणे यावर विश्वास ठेवणे हीच आपली जबाबदारी नाही का!

# नामधारकाने टाळण्याच्या गोष्टी

आधुनिक केसरी

आपले विचार स्वार्थाचे नसावेत. स्वार्थामध्ये अभिमान नेहमी जागृत असतो. स्वार्थी मनुष्याला जगात सुख मिळणे कधीही शक्य नाही. नीतीची बंधने पाळा. परस्त्री मातेसमान माना. प्रपंचात एकपत्नीव्रताने राहणारे गृहस्थ लोक ब्रह्मचारीच होत. परद्रव्याची अभिलाषा धरू नका. त्याला विष्ठेसमान माना. दुसऱ्याच्या पैक्याचा अभिलाष धरण्यात आपला किती घात आहे याची नुसती कल्पनाच केलेली बरी. परस्त्री, परद्रव्य, यांच्याप्रमाणेच परनिंदा हीही अत्यंत त्याज्य आहे. परनिंदेने न कळत आपण आपलाच घात करीत असतो. परनिंदेमध्ये दुसऱ्यांच्या दोषांचे चिंतन होत असल्या कारणाने, ते दोष आपल्याकडे येत असतात. या सर्व गोष्टी सांभाळून तुम्ही नाम घ्या, नामाचे प्रेम तुम्हाला अगदी खात्रीने येईल. हे सर्व करीत असताना तुमचे आईवडील, बायकोमुले, यांच्या बाबतीत असलेले कर्तव्य करायला चुकू नका आणि त्या कर्तव्यात आसक्ती राहू देऊ नका. कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता केलेले कर्म हे कर्तव्यच होय. ते



कर्तव्य सांभाळून नीतिधर्माने वागून आपला प्रपंच करा, आणि भगवंताचे स्मरण ठेवा. मग तुमचा प्रपंचच परमार्थरूप बनून भगवंताचे प्रेम तुम्हाला मिळेल हा माझा भरवसा तुम्ही बाळगा. प्रपंच हा मिठासारखा आहे. भाकरीत मीठ किती घालायचे असते ? तर अगदी थोडे-फक्त चवीपुरते ! परंतु आपण मिठाची भाकरी करतो आणि त्यात परमार्थाचे चिमूटभर पीठ टाकतो; मग ती भाकरी खाता येईल का ? खरे समाधान मिळाल्यावर मनुष्य खेळासारखा प्रपंच करतो. त्यामध्ये तो वर चढला किंवा खाली पडला तरी सारखाच राहील; दुसऱ्याने डाव टाकल्यावर तो आपणही डाव टाकील ! पण डाव हरला किंवा जिंकला तरी त्याची त्याला पर्वा राहणार नाही. प्रपंचात अनेक वस्तू आहेत, पण भगवंताजवळ एकच वस्तू आहे. प्रपंचात कितीही वस्तू आणल्या तरी त्या पुऱ्या पडत नाहीत, कारण एका वस्तूच्या आणण्यामध्येच दुसऱ्या वस्तूच्या आणण्याचे बीज आहे. पण भगवंताचे तसे नाही; भगवंताची वस्तू एकदा आणली की पुन्हा ती आणायला नको. समजा, एका दुकानात पुष्कळ माल भरलेला आहे; पण आपल्याला पाहिजे ती वस्तू तिथे नाही, म्हणजे आपल्या दृष्टीने तिथे काहीच नाही ! त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या मानसिक शक्ती असून तिथे भगवंत नसेल, तर त्या असून नसून सारख्याच समजाव्यात. परमात्म्याला प्रपंचरूप बनविण्याऐवजी आपण प्रपंचाला परमात्मरूप बनवावा. यातच जन्माचे सार्थक आहे. **आजचे बोधवचन आहे - परमार्थात अहंकार मिसळला की तो प्रपंचच झाला. प्रपंचातला अहंकार दूर झाला की तो परमार्थ.श्रीराम समर्थ**

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**क्वचिदुष्टाः क्वचित्तुष्टास्तुष्टा रुष्टाः क्षणे क्षणे ।**
**अव्यवस्थितचित्तानां प्रसादोऽपि भयंकरः ॥**
**स्पष्टीकरण - चंचल व अस्थिर वृत्तीच्या लोकांचे उपकारसुद्धा स्वीकारू नयेत. ते भयंकर असतात. त्या उपकारांनीही आपल्या पदरात वास आणि वैताग हेच पडत असतात. असे लोक विश्वासपात्र नसतातच मुळी. आताच्या क्षणाला कृपा केली, तर पुढच्याच क्षणाला ते शाप द्यायलाही कमी करणार नाहीत.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, २३ मे २०२३

adhunikkesari.com | Adhunik Kesari


# आदित्य ठाकरे 'भावी मुख्यमंत्री' उल्लेख असणारे बॅनर्स झळकले

## नागपुरात भावी मुख्यमंत्रीपदावरून चर्चांना उधाण

आधुनिक केसरी न्यूज

नागपूर : माजी पर्यावरण मंत्री, आमदार आदित्य ठाकरे आज सोमवारी ( २२ मे ) नागपूर दौऱ्यावर आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांच्या स्वागताचे नागपूर शहरात ठिकाठिकाणी स्वागताचे बॅनर लागले आहेत. त्यात काही बॅनर लक्षवेधी ठरत आहेत. या बॅनरवर आदित्य ठाकरे यांचा भावी मुख्यमंत्री असा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे भावी मुख्यमंत्रीपदावरून पुन्हा चर्चांना उधाण आले आहे.




अलीकडील काही महिन्यांपासून राज्यात अनेक नेत्यांचे भावी मुख्यमंत्री म्हणून बॅनर्स लागत आहेत. विरोधी पक्षनेते अजित पवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अन्य नेत्यांचेही काही बॅनर लागले होते. अशातच आदित्य ठाकरे यांचा भावी मुख्यमंत्री असा उल्लेख असणारे बॅनर्स नागपूरात लागले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्रपदाच्या शर्यतील आणखी एका नेत्याची भर पडल्याची चर्चा सुरू झाली आहे. या बॅनरबाजीवर माजी मंत्री, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. वडेट्टीवार म्हणाले, जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी हिस्सेदारी हा आमचा ओबीसींचा नारा आहे. तोच नारा महाविकास आघाडीत असणार आहे. ज्यांची संख्या जास्त त्यांचा मुख्यमंत्री होणार. हे सूत्र युतीत अनेक वर्षापासून वापरले जात आहे. मर्थकांना बॅनर लावण्याचा अधिकार आहे. अजित पवार यांच्या समर्थकांनी मध्ये बॅनर लावले होते. काही लोकांना आपला नेता मोठा व्हावा ही भावना असते. त्यामुळे बॅनरबाजी करण्यात येते. पण, महाविकास आघाडीत ज्यांचे जास्त आमदार असतील, त्यांचाच मुख्यमंत्री असणार, हेच सूत्र आहे, असे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

# कडक उन्हाने मूर्च्छित ऑस्ट्रेलियन पोपटाला मिळाले जीवदान

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** वातावरणामध्ये दिवसेंदिवस उन्हाचा तडाखा वाढत चालला असून याचा नागरिकांप्रमाणेच पक्ष्यांनाही त्रास होत आहे. अशा तापमानात आकाशात विहार करताना पक्ष्यांच्या पोटातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन पक्षी मुर्च्छित होतात आणि कोसळतात. दरवर्षी उन्हाळ्यात अनेक पक्षी डिहायड्रेशनचा त्रास झाल्यामुळे रस्त्याच्या कडेला पडलेले दिसतात. सध्या उन्हाची चाहूल लागलेली असून अनेक ठिकाणी पक्षी कोसळण्याच्या घटना घडत आहेत. अशाच एका

Budgerigar ( parakeets ) हा ऑस्ट्रेलियन वंशाचा पोपट( ज्यास Love bird असेही म्हणतात ) आज उन्हामुळे मूर्च्छा येऊन प्रा.संतोष गव्हाणे ( पक्षी मित्र ) यांच्या घराच्या गच्ची वर जिण्या जवळ आढळून आला .त्यांनी त्यास पाणी पाजून, सावलीत ठेऊन थोडे खाण्यास दिल्यानंतर तो शुद्धीत येऊन वेगाने उडून गेला. त्यामुळे एका पक्षांना जिवदान मिळाले. येत्या काही दिवसांत उन्हाचा पारा अधिक वाढणार असल्याने पक्ष्यांसाठी पाणवठे तयार करा, असे आवाहन पक्षिप्रेमींनी केले आहे. वृक्षतोडीमुळे वाढणाऱ्या सिमेंटच्या जंगलांमुळे शहरातील उष्मा वाढतो आहे. दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे माणसाला जिव्हारी लागत असताना अन्नाच्या शोधात घरट्याबाहेर पडणाऱ्या पक्ष्यांची अवस्था फारच बिकट झाली आहे.





# गंगानदीत बोट उलटली, चौघांचा मृत्यू; २० हून अधिक प्रवासी बेपत्ता

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशातल्या बलियामध्ये सोमवारी सकाळी एक मोठी नाव दुर्घटना घडली आहे. ही नाव दुर्घटना फेफना पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या माल्देपूर घाट परिसरात घडली आहे. आतापर्यंत या दुर्घटनेत चार जणांचा बळी गेला आहे. घटनास्थळावरील प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, ही दुर्घटना झाली तेव्हा बोटीवर तब्बल ४० पेक्षा जास्त प्रवासी होते. बोट उलटल्यावर बोटीतले काही लोक बेपत्ता झाले आहेत. बचाव पथक त्यांचा शोध घेत आहे. बलियामध्ये सोमवारी फेफना पोलीस ठाण्याअंतर्गत गंगा नदीत एका बोटीचा अपघात झाला. माल्देपूर घाटातून गंगा नदीच्या पात्रातून जाणारी बोट नदीच्या मध्यभागी उलटली. या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे. दुर्घटनेनंतर काही वेळातच बचावकार्य सुरू करण्यात आलं आहे. घटनास्थळी उपस्थित असलेल्या लोकांच्या म्हणण्यानुसार, या बोटीत तिच्या क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी होते. परिणामी ही बोट नदीच्या मध्यभागी उलटली. बोटीतले प्रवासी हे मुंडन समारंभात सहभागी झाले होते. बोट उलटल्यानंतर काही लोक पोहत बाहेर आले, तर घटनास्थळी उपस्थित लोकांनी लगेच नदीपात्रात उड्या मारून ज्यांना पोहता येत नव्हते अशा काही लोकांना वाचवले. लोकांनी ज्यांना नदीतून बाहेर काढले त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.दरम्यान, दुर्घटनेची माहिती मिळताच प्रशासकीय पथक घटनास्थळी दाखल झालं आहे. तसेच बचाव मोहीम हाती घेण्यात आली आहे. या दुर्घटनेचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. या व्हिडीओत स्पष्ट दिसतंय की, नदीत बुडणारे काही लोक पोहून बाहेर येतायत, तर काहीजण जीव वाचवण्यासाठी हातपाय मारतायत. दरम्यान, या दुर्घटनेनंतर बोटीतले २० पेक्षा जास्त प्रवासी बेपत्ता असल्याचे सांगितले जात आहे.

# वसतिगृहातील विद्यार्थ्याकडे जिवंत काडतुसे

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** खामगाव शहर पोलिसांनी केलेल्या कारवाईत देशी कट्ट्यासह पाच जिवंत काडतुसे जप्त केली. खामगाव नजीकच्या वाडी येथील खासगी वसतिगृहात ही कारवाई करण्यात आली असून एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडे अग्निशस्त्र आले कुठून व त्याचा उद्धेश काय ? याचा पोलीस तपास करीत आहे.

खामगाव शहर पोलीस ठाणेदार शांतिकुमार पाटील यांना काल रात्री उशिरा ही माहिती मिळाली. गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी सहायक पोलीस निरीक्षक गौतम इंगळे मोहन कुरूटले, गणेश कोल्हे, अमर ठाकूर, अंकुश गुरुदेव यांना कारवाईचे आदेश दिले. पथकाने वाडी परिसरातील सन्मती वसतिगृहाची खोली क्रमांक २०५ गाठली. तिथे असलेल्या नितीन राजू भगत ( २२, आंबे टाकळी, ता खामगाव ) याच्या साहित्याची त्यांनी तपासणी केली. यावेळी पलंगाखाली असलेल्या एका बॅगमधून शालेय प्रमाणपत्राखाली असलेल्या पिशवीतून पिस्टल सदृश्य देशी कट्टा व ५ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. याबद्धल विचारणा केली असता नितीनने उडवाउडवीची उत्तरे दिली.यामुळे पंचनामा करून पथकाने त्याला उचलले! त्याला पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

# प्रवासी बस खड्ड्यात कोसळली

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** देवदर्शनासाठी यात्रेकरु महिलांना घेऊन निघालेल्या खासगी प्रवासी बसचालकाच्या बेदरकारपणामुळे बस उलटल्याची घटना फुलगाव-तुळापूर रस्त्यावर घडली. या घटनेत नऊ महिला जखमी झाल्या असून बसचालकाच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, जखमी महिलांना घेऊन निघालेली रुग्णवाहिका उलटल्याने महिलांना दुखापत झाली. या प्रकरणी प्रवासी वाहतूक करणारा बसचालक तुषार भानुदास डाके ( वय ३१, रा. खराडी ) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चित्रा प्रसाद खरे ( वय ४८, रा. शनिवार पेठ ) यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चित्रा खरे आणि त्यांच्या मैत्रिणी अष्टविनायक यात्रेसाठी निघाल्या होत्या. फुलगाव ते तुळापूर रस्त्यावर बसचालक तुषार डाके यांनी भरधाव वेगाने बस चालविली. बसचालक डाके याचे नियंत्रण सुटून बस खड्ड्यात कोसळली. अपघातात नऊ महिला जखमी झाल्या. अपघातानंतर रुग्णवाहिकेतून महिलांना रुग्णालयात पाठविण्यात आले. रुग्णवाहिकेचा लोणीकंद परिसरात अपघात झाल्याने पाच महिलांना किरकोळ दुखापत झाली.




# मोदींचा सन्मान

आधुनिक केसरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फिजी देशाचा सर्वोच्च पुरस्कार 'कम्पॅनियन ऑफ द ऑर्डर ऑफ फिजी' या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. फिजीचे पंतप्रधान सितिवेनी राबुका यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मोदी हे जागतिक नेतृत्व असल्याचे सांगत त्यांना या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. फिजी देशाचा हा सर्वोच्च पुरस्कार फिजीबाहेरच्या केवळ काहीच लोकांना देण्यात आला आहे. नरेंद्र मोदी हे त्यापैकी एक आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या तीन देशांच्या दौऱ्यावर गेले आहेत. या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात ते पापुआ न्यू गिनी या देशात गेले आहेत. दरम्यान, पापुआ न्यू गिनीचे पंतप्रधान जेम्स मारापे काल (२० मे) स्वतः मोदींच्या स्वागतासाठी विमानतळावर हजर होते. मोदींचे स्वागत करताना जेम्स मारापे यांनी मोदींच्या पायाला स्पर्श करून त्यांचे आशीर्वाद घेतले. मोदींनीही लगेच मारापे यांची गळाभेट घेतली. दरम्यान, फिजीच्या पंतप्रधानांच्या हस्ते फिजीचा सर्वोच्च सन्मान कम्पॅनियन ऑफ द ऑर्डर ऑफ फिजी प्रदान केल्यानंतर पंतप्रधान मोदी म्हणाले, हा सन्मान फक्त माझा नाही तर १४० कोटी भारतीयांचा आहे, भारत आणि फिजीचे जुने नाते आहे. त्याबद्दल मी तुमचे (सितिवेनी राबुका) आणि राष्ट्रपतींचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. फिजीने पंतप्रधानांचा गौरव केल्यानंतर पापुआ गिनीनेदेखील मोदींचा सर्वोच्च पुरस्कार देऊन सन्मान केला. यावेळी पतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, भारत तुमचा विकासातला सहकारी आहे याचा आम्हाला खूप अभिमान आहे. कोणतीही मानवी सहाय्यता असो अथवा विकास असो तुम्ही भारताकडे एक विश्वासू सहकारी म्हणून पाहू शकता. आम्ही आमचा अनुभव आणि क्षमता तुमच्यासोबत शेअर करायला तयार आहोत. कोणत्याही संकोचाशिवाय आम्ही हे करू.



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

# लोकसभेसाठी शिवसेनेला 19 जागा देणार का ?

आधुनिक केसरी

**2024 लोकसभा निवडणुक जिंकण्यासाठी विरोधकांनी कंबर बांधायला सुरू केले असुन ठाकरे शिवसेनेचे नेते खा.संजय राऊतांनी तर 19 जागेवर आपला दावा जाहिरपणे बोलुन दाखवला. खरं तर मागच्या वेळी केवळ मोदी लाटेमुळे 18 खासदार त्यांचे निवडुन आले पण आजही ती आपली ताकद होती याच आविर्भावात राऊत असावेत. पुर्वीची शिवसेना अर्थात ठाकरे गट यावेळी महाविकास आघाडीसोबत असला तरी त्यांनी 19 जागेचा दावा केल्यानंतर प्रदेश कॉंग्रेस खडबडुन जागी झाली. नाना पटोलेंनी तर त्यांचा दावा फेटाळुन लावला. वंचित बहुजन आघाडीचे नेते ठाकरे शिवसेनेसोबत असले तरी मविआत अस्थिरता असल्याचे बोलुन दाखवलं.**

2019 च्या निवडणुकीत काँग्रेसला केवळ एक लोकसभा आणि राष्ट्रवादीला 04 जागा मिळाल्या होत्या. आता कदाचित उमेदवार मोठ्या प्रमाणावर मिळतील पण महाविकास आघाडीत मात्र कुतरओढ झाल्याशिवाय रहाणार नाही. त्यातही कर्नाटक राज्य आल्याने महाराष्ट्र काँग्रेस कॉलर फुगवणार नाही म्हटलं तरी जास्तीचा दावा ते करणार. राष्ट्रवादीचे नेते याकडे कसे पाहणार ?हे आता भविष्यात कळेल. लोकसभा निवडणुक 2024 चा रणसंग्राम येवु घातला असुन त्याच्या पुर्वतयारीला राज्यातील सारेच पक्ष लागल्याचे लक्षात येतं. पुर्वीच्या राजकारणात आणि वर्तमान महाराष्ट्राच्या राजकारणात अभुतपुर्व बदल घडुन आला तो म्हणजे यावेळी भाजपाच्या विरोधात शिल्लक ठाकरे शिवसेना उभी रहाणार अर्थात 2019 ला राज्यातील लोकांनी जनादेश महायुतीला दिला. पण मित्र म्हणून त्या काळच्या शिवसेनेने केवळ मुख्यमंत्री पदासाठी केलेला विश्वासघात आणि नंतर घडलेले रामायण ज्यातुन महाआघाडीचा जन्म झाला. हिंदुत्व वेशीला टांगलं. स्व. बाळासाहेब ठाकरेंच्या स्वप्नातला महाराष्ट्र आणि हिंदु संघटन या तत्वज्ञानाला तिलांजली देण्यात आली. केवळ मुख्यमंत्री पद मिळालं म्हणुन मातोश्रीनं सिल्वर बंगल्यावर जावुन गुडघे टेकले. त्यातुन अडीच वर्षे कारभार चालवला.जो कारभार महाराष्ट्राने पाहिला. एक तर मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे केवळ काही तास मंत्रालयात आले. वर्षावर बसुन राज्यकारभार केला. सत्तेचा गैरवापर, हिंदुत्ववाद्यांना त्रास, भ्रष्टाचार बोकाळला. एवढा मनमानी कारभार झाला ज्याला स्वतःचे सहकारी सद्याचे मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदेसारखे वैतागले आणि 40 आमदार घेवुन बाहेर पडले. तदनंतर घडामोडीचा इतिहास महाराष्ट्राने पाहिला. पण जे स्व.बाळासाहेबांना अभिप्रेत होतं ती भुमिका शिंदे गटाने घेतली. ज्यातुन नविन सरकारचा जन्म झाला. ज्याला शिंदे-फडणवीस सरकार म्हणुन ओळखल्या जातं. नऊ महिने झाले सरकारला सत्तेवर येवुन दुसऱ्या बाजुने शिवसेनेची झालेली वाताहत त्या पार्श्वभुमीवर राहिलेली शिवसेना अर्थात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे अगदी पाण्याबाहेर पडलेल्या माशाप्रमाणे तडफडताना दिसते. स्वतःच्या पक्षात शिवसेनेला फार मोठं आवाहन असल्याने लोकप्रतिनिधी थोपवण्यावर त्यांचा भर दिसतो. वास्तविक पहाता ठाकरेंची आता सत्वपरीक्षा आहे. महाविकास आघाडीत सोबत रहाणं ही गरज आता ठाकरे शिवसेनेला आहे. खा.संजय राऊतांनी 19 जागेवर दावा सांगितला असला तरी उद्या 9 जागा दिल्या तरी त्यांच्या गटाला समाधानावरच यावे लागेल. त्याचं कारण वर्तमान राजकिय स्थिती पहाता ही मंडळी महाविकास आघाडीला सोडू शकत नाही. मध्यंतरी वंचित आघाडीचे नेते डॉ.प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत केलेली युती मविआच्या लोकांना आवडली असे नव्हे. वंचित शिवाय अन्य पक्षासाठी जागा सोडाव्या लागतील. एकुण चित्र पहाता भविष्यात जागा वाटपावरून महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याशिवाय रहाणार नाही ज्याचे संकेत संजय राऊतांच्या बोलण्यावरून दिसतात. कर्नाटक राज्यात काँग्रेस आली असली तरी विधानसभेच्या निवडणुका आणि लोकसभेच्या निवडणुका याचे गणित वेगवेगळे असतात. देशाला नरेंद्र मोदी नेतृत्वाशिवाय पर्याय नाही. हे भविष्य बालवाडी शिकणाऱ्या मुलाला जरी विचारलं तरी तो सांगु शकेल. या सर्व पार्श्वभुमीवर महाराष्ट्र भाजपाने महाविजय 2024 लोकसभा निवडणुक लढवण्याची रणसंग्रामात टिकुन रहाणं हे गणित तसं फार अवघड असतं. नरेंद्र मोदीची जादु 2024 च्या लोकसभा निवडणुकीत निश्चित चालणार याची खात्री दस्तुरखुद्द शरदचंद्रजी पवार, पृथ्वीराज चव्हाण, अशोक चव्हाण या साऱ्या मंडळीला आहे. म्हणून कदाचित आज कुणी कितीही जागेवर दावा करत असले तरी जेव्हा लढाईचा रणसंग्राम सुरू होईल त्यावेळी मात्र लोकसभा लढवायला महाविकास आघाडीत इच्छुक रहाणार नाहीत अनेकजण मुलाखतीला बोलावलेले पळुन जातील. कारण तशाच प्रकारचे राजकिय वातावरण संपुर्ण देशात आहे. ज्या नेतृत्वाने



दुसऱ्या बाजुने काँग्रेस आता नव्या फार्मात असुन कर्नाटक राज्य आल्याने महाराष्ट्रात स्वबळावर आपण लोकसभा निवडणुक लढु शकतो हा आत्मविश्वास त्यांना प्राप्त झाला. पण प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या कार्यपद्धतीमुळे अंतर्गत कलह मोठ्या प्रमाणावर पसरलेला आहे. खरं तर मागच्या वेळी एकच जागा काँग्रेसला मिळाली. पण येणाऱ्या निवडणुकीत किमान 25 जागापेक्षा जास्त जागेवर काँग्रेस दावा करू शकते. कारण काँग्रेसवाल्यांचा भरवसा शरदचंद्र पवार साहेबांच्या भुमिकेवर निश्चित नसावा. त्यामुळे जास्त जागा काँग्रेस लढण्यासाठी आग्रही राहिल. तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्रात वन मॅन शो अशा प्रकारच्या राजकिय भुमिकेत पवारांची पॉवर नेहमीच राहिलेली त्या अनुषंगाने जास्तीत जास्त जागा राष्ट्रवादी पक्ष लढण्यासाठी इच्छुक रहाणार. जागा एकुण आहेत 48. त्यातही सुरू केलेली जोरदार तयारी बरंच काही सांगुन जाते. जागा वाटपाची काळजी भाजप-शिंदे गटाला अजिबात नाही. तशा प्रकारचा समन्वय दोन पक्षात आहे. यदाकदाचित एखादा राजकिय चमत्कार महाराष्ट्रात भविष्यात घडू शकतो. कारण राजकारणात कोणत्या वेळी काय घडेल याचंही भविष्य कुणी सांगु शकत नाही. अगदी मविआतले काही नेते मंडळी संभाव्य धोका ओळखुनसुद्धा पावले टाकताना दिसतात. बाकी काही असलं तरी एक अंदाज बांधणे निश्चित वाटते तो म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर महाविकास आघाडीत उभी फुट पडली तर नवल वाटण्याचे कारण नाही. 19 जागा राऊतांनी दावा करताच पटोलेंनी काही तासात त्यांचा दावा फेटाळुन लावला अर्थात जागा वाटपाचा खेळ अजुन त्यांच्यातला सुरू झालेला नाही. पण केवळ सत्ता लोभासाठी काही काळ एकत्रित येणं आणि नंतर प्रत्यक्ष आपल्या देशाचा सन्मान जगाच्या पाठीवर वाढवला, पारदर्शक कारभार करत सबका साथ-सबका विकास ज्यांनी दाखवुन दिलं हा देश गरिबांचा आहे त्यांच्यासाठी सत्ता चालवली पाहिजे. हे देखील ज्यांनी दाखवुन दिलं अशा नेतृत्वावर सर्वसामान्य लोकांचा विश्वास प्रचंड आहे. मग काश्मिरमधील 370 कलम असेल तथा अयोध्येत प्रभु रामचंद्र मंदिर बांधकाम पुर्णत्वाकडे जाणं असेल. अवघ्या नऊ वर्षात 175 योजना ज्या केवळ अठरापगड जातीधर्माच्या कल्याणासाठी सुरू केल्या. एक अष्टपैलु पंतप्रधान म्हणुन ज्यांची ख्याती जगाच्या पाठीवर अशा नेतृत्वाचा पाठीराखा होण्यासाठी या देशात सामान्य मतदारांच्यासुद्धा रांगा लागलेल्या दिसतात. म्हणुन 2024 भाजपा 400 पार निश्चित गेल्याशिवाय रहाणार नाहीत आणि हे होत असताना राज्य मविआत जागा वाटपावरून उभी फुट पडल्याशिवाय राहणार नाही.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# असियान - भारत युद्ध अभ्यासाने चीनचा तीळपापड

आधुनिक केसरी

**दक्षिण चिन समुद्रात भारत आणि असियान देशातील सदस्य राष्ट्रांचनी नौदलाने संयुक्त युद्ध अभ्यास केला. या युद्ध अभ्यासात भारताव्यतिरिक्त फिलिपिन्स, इंडोनेशिया, सिंगापूर, मलेशिया, थायलंड, ब्रूनेयी आणि व्हिएतनाम या देशाचा सहभाग होता. या सर्व देशांना मिळून आसियान समूह असे संबोधले जाते. या समूहात मुख्य देश हा भारत आहे. या समूहात सहभागी असलेले इतर देश लहान आणि सामर्थ्यहीन आहे. हा समूह तयार करण्यासाठी भरतानेच पुढाकार घेतला होता. आशिया खंडातील लहान आणि तुलनेने सामर्थ्यहीन असलेल्या देशांना आर्थिक आणि लष्करी मदत करणे हा त्यामागचा उद्देश तर आहेच पण सोबतच इंडो पॅसिफिक क्षेत्रात चीनच्या वाढत्या वर्चस्वाला शह देणे हा देखील त्यामागचा एक उद्देश आहे.**

त्यासाठीच भारतीय नौदलाच्या पुढाकाराने हा युद्ध अभ्यास घेण्यात आला. अर्थात यात नवे असे काही नाही जगभरात असे युद्ध अभ्यास चालूच असतो. या युद्ध अभ्यासामुळे चीनचा मात्र नेहमीप्रमाणे तिळपापड झाला. चीनने या युद्ध अभ्यासाच्या वेळी हेरगिरी केल्याचा दावा असियान देशांनी केला आहे. युद्ध अभ्यासाच्या ठिकाणाहून अवघ्या पन्नास किलोमीटर अंतरावर चीनची जहाजे फिरत होती तसेच चीनची लढाऊ विमानेही घिरट्या घालत होती अर्थात चीनने नेहमीप्रमाणे याचा इन्कार केला असून आम्ही हेरगिरी केली नसून आमची ही जहाजे नौदलाची नसून व्यापारी जहाजे असल्याचा दावा चीनने केला आहे मात्र चीनचा हा दावा जगाची दिशाभूल करणारा आहे हे सांगायला कोणा तज्ज्ञांची गरज पडत नाही. चीनच्या ओठात एक आणि पोटात दुसरेच असते हे जग जाणून आहे. इंडो पॅसिफिक क्षेत्रात वर्चस्व मिळवणे हे चीनचे स्वप्न आहे. हे स्वप्न भारतामुळे पूर्ण होऊ शकत नाही हे चीन जाणून आहे त्यामुळेच तो दक्षिण आशिया तसेच इंडो पॅसिफिक क्षेत्रातील छोट्या छोट्या देशांना साम दाम दंड भेद या मार्गाने आपल्याकडे वळवू इच्छित आहे. त्यासाठी त्याने अनेक देशांना अब्जावधी रुपयांचे कर्ज देऊन आपल्याकडे वळवले आहे. श्रीलंकेची आज जी अवस्था झाली आहे त्याला चिनही जबाबदार आहे चीनने श्रीलंकेला न फेडता येईल इतके कर्ज दिले त्या बदल्यात त्यांनी श्रीलंकेच्या अनेक बंदरावर ताबा मिळवला. श्रीलंकेचे हंबनटोटा नावाचे बंदर तर चीनने घशात घातले आहे या बंदरावरून तो दक्षिण आशिया आणि इंडो पॅसिफिक क्षेत्रावर लक्ष ठेवून असतो. या बंदराचा वापर तो हेरगिरीसाठी करतो. श्रीलंकेप्रमाणेच नेपाळ, भूतान, बांगलादेश, पाकिस्तान, म्यानमार या देशांबाबतही चीनने हेच धोरण अवलंबले आहे मात्र आसियान देश चीनच्या या दबावाला अद्याप बळी पडले नाही. चीन आणि फिलिपिन्स या देशांमध्ये सागरी वाद आहे चीन आपल्या सागरी हद्दीत बेकायदेशीर प्रवेश करतो म्हणून फिलिपिन्सने आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे दारे ठोठावली आहे. चीनचा हा सागरी वाद केवळ फिलिपिन्स सोबतच नाही तर असियांन देशातील इतर देशांसोबतही आहे आणि चीन या छोट्या देशावर कायम दादागिरी करत असतो म्हणूनच चीनची दादागरी रोखण्यासाठी हे छोटे देश भारताकडे आशेने



पाहत आहेत. भारतही या देशांना हवी ती मदत देत आहे त्यामुळेच या समूहाकडे चीन वक्रदृष्टीने पाहत आहे. भारत आसियान देशांना बळ देत असल्याने इंडो पॅसिफिक क्षेत्रात चीनच्या निरंकुश वर्तनाला आळा बसत आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# फुलंब्री सभापतीपदी महिलेला संधी, बागडेंनी निर्णय घेतला

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** पंधरा वर्षापासून काँग्रेसच्या ताब्यात असलेल्या फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीची सत्ता भाजपने यंदा खेचून आणली. फुलंब्रीचे आमदार हरिभाऊ बागडे यांच्या नेतृत्वाखाली भाजप-शिंदे सेना युतीने १८ पैकी १४ जागा जिंकत बहुमत मिळवले. आता उद्या (ता.२२) रोजी सभापती, उपसभापतींची निवड केली जाणार आहे. तत्तपुर्वी आज झालेल्या बैठकीत बागडे यांनी सभापती पदावर महिला संचालकाला संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदेच्या माजी महिला व बालकल्याण सभापती तथा सर्वाधिक मतांनी विजयी झालेल्या नवनिर्वाचित संचालक अनुराधाताई चव्हाण यांना सभापती पदाचा मान देण्यात येणार असून त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे. फुलंब्री मतदारसंघातील बाजार समितीसह छत्रपती संभाजीनगर बाजार समितीत सभापती ठरवण्याचे सर्वाधिकार बागडे यांच्याकडेच आहे. फुलंब्रीचा निर्णय बागडे यांनी झटपट घेतला, मात्र छत्रपती संभाजीनगरचा निर्णय घेतांना त्यांना बरीच कसरत करावी लागत आहे. भाजपाची फुलंब्री बाजार समितीत एक हाती सत्ता मिळविल्यानंतर सभापती भाजपचा तर शिंदे गटाला उपसभापती पद दिले जाणार आहे. सभापती पदासाठी बागडे नानांचा आशिर्वाद कोणाला मिळणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. अखेर तो अनुराधाताई चव्हाण यांना मिळाल्याच स्पष्ट झाले आहे. उपसभापती पदी दत्तू करपे यांचे नाव अंतिम झाल्याची देखील माहिती आहे. चव्हाण या विधानसभेच्या दावेदार म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. २०१९ मध्ये देखील त्यांनी उमेदवारीसाठी प्रयत्न केले होते. बागडे यांनी त्यांच्याच नावावर शिक्कामोर्तब केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. ३० एप्रिल रोजी झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने अकरा जागेवर विजय मिळविला होता. तर त्यांच्यासोबत असलेल्या शिंदे गटातील किशोर बलांडे गटाने तीन जागांवर यश मिळविले.



## वैजापूरला सदगुरू गंगागिरीजी महाराज अखंड हरिनाम सप्ताह मिळावा म्हणून वैजापूरकर सरला बेटावर

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** सराला बेटचा सदगुरू गंगागिरीजी महाराज यांचा अखंड हरिनाम सप्ताह या वर्षी वैजापुरला मिळावा म्हणून वैजापूर येथून रविवार(ता.२१)रोजी जवळपास हजार स्त्री-पुरुष यांनी बेटावर जाऊन ह.भ.प. रामगिरीजी महाराज यांना अखंड हरिनाम सप्ताह मिळावा म्हणून विनंती केली. महाराजानी सांगितले की,सर्वांना सोबत घेऊन, सर्वांच्या सोबत विचार विनिमय करून, जागा पाहणी करून, एकादशीच्या दिवशी होणाऱ्या कीर्तन कार्यक्रमात अखंड हरिनाम सप्ताहाचा नारळ देण्याची प्रथा आहे. ती पूर्ण करू यावेळी आयोजक माजी नगराध्यक्ष बाळासाहेब संचेती, माजी आमदार भाऊसाहेब पा,चिकटगावकर, संजय पा. निकम, माजी नगराध्यक्ष राजुसिंह राजपूत, अविनाश गलांडे, ॲड. प्रमोद जगताप, अखिल शेख, ज्ञानेश्वर जगताप, प्रशांत पा. सदाफळ, पंकज ठोंबरे, अंजली जोशी, शोभचंद संचेती, रवींद्र साखरे, डॉ. राजीव डोंगरे, डॉ. अमोल अन्नदाते यांनी आपल्या मनोगतात सप्ताह वैजापूरला मिळावा म्हणून विनंती केली. सूत्र संचलन धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले आभार विशाल संचेती यांनी मानले. याप्रसंगी सचिन वाणी, देविदास वाणी, ॲड आर.डी. थोट,व्यापारी संघाचे काशिनाथ गायकवाड, वैजापूर किराणाचे प्रकाश बोथरा, संतोष बोथरा, काशिनाथ भावसार, साई बहु उद्धेशीय मंडळाचे कैलासशेठ साखरे, राजू लालसरे, साई माऊलीचे महेंद्र काटकर,राम उचित, जायेंट्सच्या विद्या चापानेरकर, राजू चांदवडे, भावलाल सोमासे, गोविंद दाभाडे, गणेश अनर्थे, अल्ताफ बाबा, सुलतान कुरेशी यांच्यासह शहरातील विबिध संस्था, मंडळे, समुदायाचे पुरुष-महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोयगाव येथे कबड्डी स्पर्धाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** येथील छत्रपती शिवाजी क्रीडा मंडळ व क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने सोयगाव येथे दि. २७ व २८ मे रोजी रात्रीच्या प्रकाशझोतात राज्यस्तरीय जालना खासदार रेल्वे मंत्री रावसाहेब दानवे चषक खुल्या कबड्डी स्पर्धा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या राज्यस्तरीय खुल्या कबड्डी स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण यांनी केले आहे.या स्पर्धेचे उद्घाटन केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे हे करणार आहेत. स्पर्धेत राज्यातील जास्तीत संघांनी सहभागी होण्याचे आवाहन छत्रपती शिवाजी क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विलास हरपाळे व सोपान गव्हांडे यांनी केले आहे. प्रथम बक्षीस ६१ हजार, दुसरे ३१ हजार रुपये व तृतीय बक्षीस १५ हजार रुपये देण्यात येणार आहे. तसेच स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघास प्रवेश शुल्क १००१ रुपये ठेवण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे हे करणार असून अध्यक्षस्थानी कृषिमंत्री अब्दुल सत्तार राहणार आहेत. स्पर्धेत सहभागी असलेल्या बाहेरगावावरून येणाऱ्या खेळाडूंच्या निवास व भोजनासाठी राहण्याची व भोजनाची सर्व प्रकारे व्यवस्था करण्यात येणार आहे, असे ही जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण यांनी बोलताना सांगितले.

## वैजापूर -गंगापूरच्या सर्वांगीण विकासासाठी दूरदृष्टी ठेऊन विकास गंगा आणणारे आ.प्रा. रमेश पा. बोरनारे

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** अत्यंत अभ्यासू तसेच विकास,उन्नतीच्या योजना शासनाकडून खेचून आनून त्या वैजापूर-गंगापुर तालुक्यातील गोर गरीब जनते पर्यंत पोहचवणारे विकास पुरुष, दूर दृष्टीचे दमदार व कर्तव्य दक्ष आमदार म्हणजे आ. रमेश पा,बोरनारे आहेत असे उदगार राज्याचे महसूल,पशूसंवर्धन,व दुग्ध विकास मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यानी शनिवार(ता,२०)रोजी वैजापूर येथे काढले, येथील तहसील कार्यालय च्या नविन इमारतीचे भूमिपूजन प्रसंगी ना,विखे पाटील बोलत होते या इमारत साठी आ,प्रा,रमेश पा,बोरनारे यानी आपल्या विशेष प्रयत्नाने शासनाकडून ८कोटी ९४लक्ष रुपये मंजूर करुन घेतले आहेत,या बाबत आ,बोरनारे यांच्या प्रयत्नांची व पाठ पुरावा याची प्राशषा करुंन ना विखे पा,पुढे म्हणाले की,शासनाच्या सर्व प्रकारच्या योजना कार्यकर्त्यांनी तळा गाळातील घटका पर्यंत पोहचविण्यची जबाबदारी कार्यकरते यांची आहे,आज पशुसन्वर्धन दिन आहे. अध्यक्ष केंद्रीय अर्थ राज्यमंत्री ना डॉ,भागवत कराड होते त्यानीही वैजापुर एम,आय,डी,सी,प्रश्न,विनायक कारखाना प्रश्न,रामकृष्ण उपसा जल सिंचन प्रश्न राज्य सरकारने सोडवावे केंद्र सरकार निसचित मदत करेल असे सांगितले,समृधी महामार्ग येनारी गैस पाईप लाईनचे कनेक्शन वैजापुरला देण्यात येईल असे कराड म्हणाले. आ. हरीभाऊ बागडे यांचे ही भाषण झाले. प्रास्ताविक आ.प्रा.रमेश पा.बोरनारे यानी करुन तालुक्यात व शहरात साडे तीनशे ते चारशे कोटीचा निधी आनून विविध विकास कामाना सरकारच्या गतिमान सरकार या धोरण नुसार गती दिली असल्याचे ते म्हणले. जिल्हाधिकारी अस्तिकुमार पांडे,जिल्हा पोलिस प्रमूख मनिष कलवानीया,अप्पर जिल्हाधिकारी अनंत गव्हाणे,श्री सुग्रीव केंद्रे,तसेच डॉ,दिनेश परदेशी, एकनाथ जाधव,उपनगराध्यक्ष साबेर खान ,बाळासाहेब संचेती,माजीद कुरेशी,बाबासाहेब जगताप,कल्याण डांगोडे,राजेन्द्र पा,साळुंके,पारस घाटे,दिनेश राजपूत,दशरथ बनकर,सुलभाताई भोपळे,कविता पवार,रामहरी जाधव,भागीनाथ दादा मगर,साहेबराव औतडे,अन्कुश हिन्गे, आमिरअली,सुप्रिया व्यवहारे आदी उपस्थित होत




महाराष्ट्र Business Katta












# नेता पक्षाचा असावा की जनतेचा ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**लोकशाही पद्धतीमध्ये जनता आपला प्रतिनिधी निवडून देऊन जनतेच्या हक्क अधिकाराचे संरक्षण व शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा मिळून महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी व जनतेच्या समस्या सोडवण्याची जबाबदारी निवडून आलेल्या प्रतिनिधी वर असते. लोक प्रतिनिधी हा लोकसेवक असतो. लोकांच्या समस्या सोडविणे, शिक्षण, रोजगार, आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्याला जनतेताच भरभक्कम निधी मिळत असतो. शिवाय जनसेवा करताना वैयक्तिक उत्पन्नावर दूर्लक्ष होऊ नये व लोकप्रतिनिधीच्या कुटूंबाला कोणताही प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागु नाही म्हणून सेवा करण्याचे भरगच्च मानधन मिळते.**

सध्या तर दिर्घकाल शासकीय नोकरी करणाऱ्या नोकरदारांना पेन्शन मिळत नाही पण लोक प्रतिनिधींना पेंशनही मिळते. कार्यालयाच्या खर्चापासुन तर आपल्या कार्यक्षेत्रात व कार्यक्षेत्राबाहेर प्रवासाची मोफत सुविधा असते. स्वतः सह कुटुंबातील सदस्यांना दवाखान्याचा खर्च व इतर सुखसुविधा मिळून लोकप्रतिनिधी ला आरामदायी राहता यावे म्हणून वेगवेगळे भत्ते दिले जातात. अर्थात हा सर्व खर्च व मानसन्मान फक्त आणि फक्त जनकल्याण करण्यासाठी, जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी केला जातो. महिण्याला लोकांची सेवा करण्यासाठी लोकप्रतिनिधींना लाखो रुपये मिळतात त्यात हजारो रुपये मोबाईल खर्च म्हणून मिळतात. जनप्रतीनिधी जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी जनतेला फोन करेल, समस्या जाणुन घेईल म्हणून हजारो रुपये मोबाईल साठी, जनतेचे काही पत्र असतील, निवेदने असतील, काही अर्ज, तक्रारी लिखित स्वरूपात असतील, सर्व सामान्य लोकांना लिहता येत नाही योग्य ती मांडणी करता येत नाही ह्या अडचणी दुर होण्यासाठी प्रत्येक प्रतिनिधी ला एक संगणक, प्रिंटर व त्यावर योग्य काम करण्यासाठी एक कामगार सरकार कडून मिळत असतो. दरमहा त्याचा खर्च न चुकता आपल्या प्रतिनिधी यांना मिळतो. म्हणजे जनप्रतीनिधी यांना स्वतः च्या खिशातील एकही रुपया खर्च करायचा नसतो. फक्त जन सेवा करायची असते जनतेच्या समस्या सोडवायच्या असतात. प्रत्येक लोकप्रतिनीधींवर दरमहा लाखों रुपयांचा खर्च होतो. तर काय एवढा खर्च होऊनही जनतेची कामे होतात ? बरेच कामे लोकप्रतिनिधी यांच्या अधिकार क्षेत्रात असतात दरवर्षी करोडो रूपयो त्या कामासाठी निधी सुद्धां येत असतो. असे सगळं काही सुरळीत असताना लोकप्रतिनिधी निधी खर्च करतात तरी कुठे ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. म्हणून नागरिकांनी एक गोष्ट आवर्जून लक्षात घ्यायला पाहिजे आपला जो लोकप्रतिनिधी अर्थात आपण त्याला नेता म्हणतो तो नेमका कोण असायला पाहिजे ? पक्षाचा असायला पाहिजे की जनतेचा असायला पाहिजे ? हल्ली राजकारणाची व निवडणूकीची व्याख्या एवढी बदलली की लोकांचा राजकारणावरचा विश्वास उडत चालला आहे. राजकारण ही यशाची व प्रगती चाबी आहे. तरीही लोकांच्या मनात राजकारणाविषयी चुकिच्या भावना व चुकिचे मत निर्माण झाले ते फक्त स्वार्थी राजकारणी लोकांमुळे, जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतीनिधीं यांनी इमानदारीने काम न केल्यामुळेच. जनतेची सेवा करण्याच्या नावाखाली जनतेच्या नावावर मेवा खाण्याचे काम सुरू आहे. आज एक लोकप्रतिनिधी निवडून आला की त्याची संपती किती वाढत जाते हे सर्वांना माहिती आहे. लोकप्रतिनिधींची संपत्ती वाढत जाते त्या सोबत च जनतेच्या समस्याही वाढत जातात. कारण जनतेच्या नावावरचा निधी चुकिच्या पद्धतीने वळवून स्वतः चीच घरे भरण्याचे काम येतील लोकप्रतिनिधी करतात. लोकप्रतिनिधी यांना निवडून आल्यावर पक्ष निधी सुद्धां काही द्यावा लागतो. तसा पक्ष कसा चालेल ? लोकप्रतिनिधी निवडून आल्यावर लाखो करोडे रुपये पक्षनिधी म्हणून देतात. हा पैसा नेमका असतो कोणाचा ? अनेक मोठमोठे राजकीय कार्यक्रम आज करोडो रुपये खर्च करून कार्यक्रम घेतले जातात. या कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी एवढा पैसा येतो तरी कुठून ? याची चौकशी कधी होत नाही.



आणि पक्षाला निधी दिल्यानंतर त्या पक्षाचे सरकार सत्तेत जरी असले तरी चुकीचे काम करणाऱ्या लोकप्रतिनिधी ला सत्ताधारी पण बोलत नाहीत. विरोधकही कधीतरी सत्तेत असतात, सत्तेत नसलेले लोकही कुठे ना कुठे तडजोड करतात म्हणजे प्रत्येक जन कुठे ना कुठे स्वार्थासाठी मॅनेज झालेला असतो आणि म्हणून कोणीच कोणाच्या भ्रष्टाचार वा जनतेच्या पैशाचा गैरवापर यावर ठामपणे बोलत नाही. कारण प्रत्येकाचा काही ना काही काळाबाजार असतो. म्हणून ते गप्प बसतात. यामुळेच जनतेच्या समस्या वाढत जातात. अपवादात्मक एखादा लोकप्रतिनिधी चांगले काम करण्याचा प्रयत्न करतात परंतु पक्षातील लोक त्याला ते काम बरोबर करू देत नाही. लोकशाही मध्ये जनता हीच राजा असते. आणि याच जनतेच्या सेवकाची निवड करण्याचा पुर्ण अधिकार जनतेलाच आहे. जनता जर जागृत होऊन आपला प्रतिनिधी निवडला तर जनतेच्या समस्या सूटतील परंतू जनता जनतेचा प्रतिनिधी निवडत नाही तर पक्षाचा प्रतिनिधी निवडते म्हणून समस्या कायम असतात. आज पर्यंत पक्ष आपल्या पक्षाचे प्रतिनिधी म्हणून एक प्रतिनिधी एका मतदार संघात उभा करत असतो असे प्रत्येक पक्ष आपापले उमेदवार उभे करतात. नागरिक प्रस्थापित पक्षाच्यांच नेत्यांना निवडून आणतात याचे मुख्य कारण नागरिकांचे अज्ञान. पक्ष उमेदवार देतो, पक्ष कधीच लोकांचा नसतो. तरीही लोकांचा नसलेला पक्ष लोकांचे जनप्रतिनिधी खरंच निवडून आणेल की स्वतः चे ? पक्षाला पक्षाच्या कोअर कमेटीला जो योग्य वाटतो तो उमेदवार म्हणून जाहीर केला जात. परंतु जनतेचा जनसेकव कसा असावा ? कोण असावा यासंदर्भात लोकांचे काहीच मत घेत नाही. कोअर कमीटी तिकीट देऊन टाकते. म्हणजेच तो निवडून आला तरी तो जनतेचा नसतो तर पक्षाचा असतो. निवडून आल्यावर तो जनतेचे नाही पक्षाचे ऐकतो. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी जबाबदारी म्हणून तो बोलत नाही. मी प्रतिनिधी आहे वरिष्ठांना कळवतो, ते जो निर्णय घेतील तो आपण मान्य करू असा सल्लाही देतो. निवडून आल्यानंतर त्याला जनता नव्हे पक्ष महत्त्वाचा वाटतो. आणि ज्या ज्या ठिकाणी लोकप्रतिनिधी पक्षाच्या विश्वासावर बसले तेथे समस्या जास्त प्रमाणात आहेत. उलटपक्षी काही ठिकाणी अपक्ष उमेदवार निवडून येतात. लोक पक्ष बघून नाही तर व्यक्ती बघुन लोकप्रतिनिधी निवडतात त्या भागात परिस्थिती थोडीफार बरी असते. म्हणून लोकप्रतिनिधी निवडताना जनतेने जागृत होऊन निवडायला पाहिजे. जो प्रतिनिधी सर्व सामान्य जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी सरकार दरबारी आवाज उठवेल, जनतेच्या समस्या समजून घेऊन त्या सोठविण्याची जबाबदारी घेईल. सरकारची समस्या लोकांना नाही तर लोकांची समस्या सरकारला सांगेल असा लोक प्रतिनिधी. लोकांनी निवडायला पाहिजे. प्रतिनिधी निवडताना त्याची जात धर्म पक्ष न बघता तो लोकांचे काम करू शकतो का ? आज पर्यंत त्याने कशा पद्धतीने काम केले ? उमेदवाराची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे का ? अशा बाबींचा विचार करून लोकांच्या समस्या सोडवून शिक्षण, रोजगार, आरोग्य साठी तत्पर असणारा व महागाई साठी सरकार सोबत भांडणारा प्रतिनिधी आवश्यक असतो. पक्षाचे प्रतिनिधी असल्यास ते जनतेचा कोणताही विचार करत नाहीत. स्वहित बघून पक्ष म्हणेल त्याला पाठींबा देतात. जनतेला कोणत्याही गोष्टींची जाणीव नसताना कोणासोबतही हातमिळवणी करतात. पक्ष सांगेल ते ऐकावे लागते म्हणून पक्षाचा उमेदवार आपला जरी प्रतिनिधी असेल तरीही तो काम पक्षाचेच कळणार. काहीही झाले तरी जनतेचा विश्वास घात होणार नाही, जनतेच्या समस्या वाढू देणार नाही, शिक्षण रोजगार व इतर जनकल्याणाची जाणीव ठेवून कार्य करत असलेला उमेदवारच जनतेचा होऊ शकतो. म्हणून जनतेने जागृत होऊन पक्षाने कोणालाही तिकीट दिले तरी आपण मत कोणाला द्यायचे हे आपल्या हाती असते. सत्ता, पैसा यासमोर लाचार होऊन स्वतः चे घर भरणारा माणूस हा जनतेचा कधीच होऊ शकत नाही. निवडून आल्यावर पक्षाची बाजु मांडणारा उमेदवार कधीच लोकांचे भले करू शकणार नाही. म्हणून जनतेचे मुद्दे प्रामाणिक पणे मांडणारा, कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करणारा, मतदार संघातील प्रत्येक माणसासोबत न्यायीक भुमीका ठेवणाऱ्या व्यक्तीला लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दिले तर समाजातील समस्या कमी व्हायला सुरुवात होईल. राजकारणाची दिशा दशा लोकांनी बघितली आहे. पक्षाशी एकनिष्ठ राहून व मंत्रीमंडळात समावेश व्हावा म्हणून विचार स्वाभिमान व सन्मान गहाण टाकणारा लोकप्रतिनिधी लोकांच्या समस्या च निर्माण करत असतो. जनतेने जागृत होऊन आपला प्रतिनिधी कसा असावा याचा विचार करूनच निवडावा. आपलाच जनप्रतिनिधी ठरवु शकतो विकास करायचा की स्वतः चे घर भरायचे ? पक्षाने उभा केलेल्या व्यक्तीला निवडून दिल्या पेक्षा जनतेने स्वतः उमेदवार उभा करून निवडून आणला तर त्याच्या वर जबाबदारी म्हणून तो काही प्रमाणात कामे करू शकतो. शेवटी लोकशाही मध्ये अंतिम निर्णय हा जनतेचाच असतो. म्हणून जनतेनेच ठरवावे आपला नेता कसा पाहिजे ?

# डॉ.किशोर सानप: संत वाङ्मय अभ्यासक, साक्षेपी समीक्षक!




प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**संत वाङ्मयाचे दृढमूल चिंतक, आपल्या साक्षेपी समीक्षेने नव लेखक-कवींची भक्कमपणे पाठराखण करणारे, समाजातील विविध मूलगामी विषयावर कादंबरी, ललित लेखनातून भोवतालाचे डोळे उघडवणारे मराठी वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, सुप्रसिद्ध लेखक डॉ.किशोर सानप यांचे निधन झाले! आधुनिक मराठी वाङ्मय अवकाशातील एक ओजस्वी तारा निखळला! चिरेबंदी मंदिराच्या दोन शिळांच्या खिंडीतून दुर्दम्य इच्छाशक्तीने एखादा औदुंबर रुजावा आणि आपल्या थंडगार छायेने मंदिराचा संपूर्ण गाभारा शीतल व्हावा! मुळाशी ना कुठली माती ना पाणी, तरीही औदुंबर आपले काम करत राहतो!**

अगदी याच संघर्षशील न्यायाने डॉ.किशोर सानप सरांचे जीवनगाणे बहरत गेले. अकोला शहरात रहात असले तरी घरी परिस्थिती बेताचीच, त्यामुळे एक तरुण वयात स्थिरस्थावर होण्यासाठी धडपडत होता. वडिलांना नौकरी नसली तरी घरी वारकरी परंपरा रुजलेली होती. त्यात आजोबा ( आईचे वडील ) कीर्तनकार! अगोदरचे कीर्तनकार हे आजच्यासारखे नव्हते 'उथळ पाण्याला खळखळाट भारी!' आजोबांच्या अभ्यासपूर्ण, भक्तीने ओतप्रोत कीर्तनांनी श्रोते मंत्रमुग्ध व्हायचे आणि युवा किशोर आजोबांची कीर्तने ऐकून प्रभावित व्हायचा, त्यावर चिंतन- मनन करायचा. श्री किशोर सानप यांच्यात तरुण वयात वारकरी विचारांचे बाळकडू रुजले आणि त्यानंतर सुरु झाला त्यांचा पुढील खडतर प्रवास! वाणिज्य पदवी-पदव्युत्तर-एम.फील.पर्यंतचे शिक्षण पूर्ण होऊनसुद्धा नौकरीचे कुठेच मिळाली नाही. विशेषतः वाणिज्य शिक्षण घेतांना त्या आभासी आकडेमोडीत त्यांना कधी रस वाटलाच नाही. ग्रंथालयात बसून तासनतास विविध ग्रंथांचे वाचन करतांना त्यांना मराठी कथा-कादंबरी वाचनाची ओढ लागली. मग त्यांनी बहिःशाल विद्यार्थी म्हणून मराठी विषयात पदव्युत्तर पदवी संपादन केली. अगोदरच संशोधनाचा अनुभव असल्यामुळे त्यांना मराठी विषयात डॉ.भालचंद्र नेमाडे यांच्या साहित्यावर १९९२ साली नागपूर विद्यापीठातून आपले पीएच.डी.संशोधन पूर्ण केले. दुसरीकडे त्यांचे लेखन आणि नौकरीचा शोध सुरूच होता. आता डॉ.किशोर सानप विदर्भात लेखक म्हणून बऱ्यापैकी नावारूपास येत असतांना वर्धा येथील गो.से.वाणिज्य महाविद्यालयात अध्यापक म्हणून ते रुजू झाले. नौकरीमुळे आर्थिक स्थैर्य आले आणि सुरु झाला त्यांच्या आवडत्या लेखन प्रांतातील आनंददायी प्रवास! डॉ.भालचंद्र नेमाडे, शाम मनोहर सरांसारख्या सखोल, व्यासंगी, बहुभाषिक, बहुआयामी, रोखठोक लेखकांच्या वाङ्मयावरील समीक्षा, साक्षेपी संशोधनाने सानप सरांची वैचारिक बैठक मजबूत झाली. वाचन समृद्ध झालेले सानप लेखन प्रांतात उतरले. त्यातूनच त्यांचा 'ऋतू' हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर महाराष्ट्रातील



कुपोषित बालकांच्या व्यथा मांडणारे 'कोवळी पानगळ' या महत्वपूर्ण वैचारिक ग्रंथाने डॉ.किशोर सानप मराठी वाङ्मयात ओळखले जाऊ लागले. त्यांचे मित्र श्री मनोज तावडे यांच्यासह 'तुकारामः व्यक्तित्व आणि कविता' नावाचा त्यांचा वैचारिक ग्रंथ प्रकाशित झाला. आजोबांकडून आलेला कीर्तन-प्रवचनाचा वारसा अनायासे सानप सरांच्या लेखणीतून पाझरू लागला. तुकाराम स्पर्शाने प्रज्वलित झालेल्या विचार समृद्ध, संस्कार प्रगल्भ डॉ.सानप सरांनी त्यानंतर मात्र मागे वळून पाहिलेच नाही. संत तुकाराम आणि नेमाडेंचा खोलवर प्रभाव त्यांच्यावर दृगोचर झाल्याशिवाय रहात नाही. त्यातूनच 'दशक्रियाची उत्तरक्रिया' वैचारिक लेख संग्रह, 'देशीवाद आणि मराठी साहित्य समीक्षा' सारखे मराठी वाङ्मय समीक्षेच्या प्रांतातील महत्वपूर्ण ग्रंथ त्यांच्याकडून लिहिले गेले. त्यानंतर त्यांच्या 'पांगुळवाडा' कादंबरीने बरीच खळबळ माजवली. एका नव्या विषयावरील आशयपूर्ण कादंबरीने डॉ.सानप पुरोगामी, सडेतोड लेखक म्हणून नावारूपास आले. 'प्रबोधन युगाची सांस्कृतिकताः आदि भारत ते आधुनिक भारत', 'भाषा, समाज, साहित्य, संस्कृतीः सत्व आणि मुल्य', 'भालचंद्र नेमाडे यांची कविता, 'भालचंद नेमाडे यांची समीक्षा', 'मराठी कविताः नव्या दिशा', 'मराठी कविताः नव्या वाटा', 'मराठी कादंबरीः नैतिकता', 'मराठी कादंबरीः पाऊलखुणा', 'मराठी कादंबरीचे साहित्यशास्त्र' सारखे एकानंतर एक महत्वपूर्ण ग्रंथांचे लेखन डॉ.किशोर सानप सरांनी केले. यामुळे त्यांचा वैचारिक आणि लेखनिक आवाका नवलेखकांच्या नजरेतून सुटूच शकला नाही. हे सर्वच महत्वपूर्ण ग्रंथ आधुनिक मराठी भाषेच्या परिक्षेत्रातील महत्वपूर्ण समीक्षा ग्रंथ म्हणून नावारूपाला आले. कविता आणि कादंबरीच्या प्रांतात संशोधन करणाऱ्या संशोधकांना डॉ.सानप सरांचे हे सर्वच ग्रंथ पाथागामी झाले. डॉ.किशोर सानप सरांच्या समीक्षेची व्याप्ती सर्वत्र आढळून येत होती. दुसरीकडे सानप सरांना संत तुकाराम स्वस्थ बसू देत नव्हते. 'विद्रोही तुकाराम', 'तुका म्हणे', 'पुन्हा एकदा तुकाराम', 'तुकाराम दर्शन' सारखे संत तुकारामावर महत्वपूर्ण ग्रंथ डॉ.भालचंद्र नेमाडे, डॉ.सदानंद मोरे, डॉ.दिलीप चित्रे, डॉ.आ.ह.साळुंखे सारख्या विभूतीकडून लिहिले गेले होते. तुकोबांच्या विचारांची वाट या सर्वच महानुभावांनी सुकर केली असतांना सानप सरांना तुकारामासी तासनतास संवाद सुरु झाला. त्यातूनच 'महाकवी संत तुकाराम दर्शनः खंड १ ते ५' आणि 'युगपुरुष तुकाराम' या सहा महत्वपूर्ण ग्रंथांचे लेखन करून त्यांनी आपल्यावरील वारकरी संस्कारांचे ऋण फेडले. याशिवाय घरातील पंढरीची वारी सानप सरांना सातत्याने पंढरीला बोलवत होती. पंढरपूरच्या निळ्या दैवताची खोलवर रुजवणूक झाल्यामुळे 'भूवैकुंठ' ग्रंथाची निर्मिती झाली. यानंतर सानप सरांचे लेखन आणखीच बहरत गेले. एक लेखक घेऊन त्याचे संपूर्ण लेखन अभ्यासून त्यावर समीक्षा लिहिणे असा सपाटाच लावला. त्यातून 'रामदास फुटाने यांची कविता', 'रामदास फुटाने यांची भाष्य कविता', 'लघुपत्रिकेतील कविता', 'शाम मनोहर यांच्या कविताः शोध' 'समकालीन मराठी कविता आणि जागतिकीकरण', 'समकालीन समीक्षाः जाणीवा आणि भाष्य', 'समकालीन स्त्रियांच्या कादंबऱ्या', 'समांतर ग्रंथ निर्मितीः दाखल आणि भाष्य', 'साठोत्तरी मराठी कविता आणि देशियता', 'साठोत्तरी मराठी कादंबरीः मूल्य निर्मितीच्या दशा', 'सांस्कृतिक वर्तमान' इत्यादी जवळपास ४० पेक्षा जास्त समीक्षेच्या प्रांतातील अत्यंत महत्वपूर्ण ग्रंथांचे अभ्यासपूर्ण समीक्षा लेखन डॉ.किशोर सानप यांच्याकडून झाले. शिवाय आजघडीला जवळपास १० ग्रंथ लेखन पूर्ण झाले असून लवकरच या सर्वच ग्रंथांचे प्रकाशन होणार होते. जेमतेम ६७ वर्षे जीवन लाभलेल्या डॉ.किशोर सानप सरांनी पन्नासपेक्षा जास्त महत्वपूर्ण ग्रंथांचे लेखन करून मराठी सारस्वतात आपली वेगळी ओळख निर्माण केली. यानंतरसुद्धा त्यांच्याकडून समीक्षेच्या प्रांतात आणखी महत्वपूर्ण ग्रंथ निर्मिती होणारच होती, परंतु काळ-वेळ कुणासाठी थांबत नाही. मागील काही वर्षांपासून डॉ.सानप शारीरिक व्याधींनी त्रस्त होते. यातच काल २१ मे रोजी डॉ.किशोर सानप सरांनी आपल्या कन्येच्या हॉस्पिटलमध्ये अखेरचा श्वास घेतला. जुने-नवे यांचा सुरेख संगम घालून नवलेखकांना लिहिते करणारे हात अचानक शांत झाले. ऐंशीच्या दशकानंतर मराठी कवितेला अधुनिक परीपेक्षातून समीक्षा लेखन करणाऱ्या एकमेव साक्षेपी समीक्षकाने इहलोकीचा निरोप घेतला. त्याला जोडून महानुभाव, संत, वारकरी वाङ्मयाचे समकालीन जीवनाच्या अनुषंगाने विवेचन करून सानप सरांनी मराठी साहित्य विश्वाला ग्रंथ समृद्ध केले आहे. डॉ.किशोर सानप सरांच्या जाण्याने समीक्षा, संत, वारकरी, काव्य, कादंबरी लेखन प्रांतातील पोकळी न भरून येणारी आहे! त्यांचा साक्षेपी समीक्षा आणि संत वाङ्मय लेखणीचा वसा आणि वारसा आपण नव्या पिढीच्या सर्वच लेखक, समीक्षक अभ्यासकांनी पुढे घेऊन जायला हवा! असे होणे म्हणजेच डॉ.किशोर सानप सरांना खऱ्या अर्थाने शब्द सुमनांजली असेल! ओम शांती!

# संघराज्य व त्याचे राज्यक्षेत्र




नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र. : 7276526268

आधुनिक केसरी

**संविधानाविषयी अत्यावश्यक माहिती जाणून घेतल्यानंतर, आता आपण त्याच्या अंतरंगात डोकावण्याचा प्रयत्न करणार आहोत. संविधानाच्या अनुच्छेदांना एकेक करून समजून घेऊनच आपण त्याचे अंतरंग जाणू शकतो. आपणास पूर्व कल्पना आहेच की, आपल्या संविधानात '२५ भाग' '१२ अनुसुच्या' आणि '३९५ अनुच्छेद' आहेत. गरजेनुसार वेळोवेळी आपल्या राज्यघटनेत 'घटनादुरुस्त्या' होऊन या अनुच्छेदांची संख्या '४५०' च्याही वर पोहोचलेली आहे. परंतु हे वाढलेले अनुच्छेद '३९५' च्या पुढे न मांडता, आहे त्याच अनुच्छेदांमध्ये 'खंड, उपखंड' म्हणून मांडल्यामुळे आपल्या राज्यघटनेतील अनुच्छेदांची संख्या ही '३९५च' दिसते.**

आजच्या भागात आपण 'अनुच्छेद-१ व २' च्या अनुषंगाने 'पहिल्या व चौथ्या अनुसूचीत' बदल करण्याची 'तरतूद' करणारे अनुच्छेद-४ पाहूया... अनुच्छेद-४:-पहिल्या व चौथ्या अनुसुचीच्या सुधारणेसाठी आणि पुरक, आनुषंगिक व परिणामस्वरूप बाबींकरीता तरतूद करण्यासाठी अनुच्छेद-२ व ३ अन्वये करण्यात आलेले कायदे : खंड (१):- अनुच्छेद-२ किंवा ३ मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही कायद्यात , त्या कायद्याच्या तरतुदी लागू करण्यासाठी आवश्यक अशा, पहिली अनुसुची व चौथी अनुसुची यात सुधारणा करण्याविषयीच्या तरतुदी अंतर्भूत असतील आणि संसदेला आवश्यक वाटतील अशाही पुरक आनुषंगिक व परिणामस्वरूप तरतुदी (अशा कायद्याचा परिणाम होणार्या राज्याच्या किंवा राज्यांच्या संसदेतील व विधानमंडळातील किंवा विधानमंडळांमधील प्रतिनिधित्वासंबंधीच्या तरतुदींसह) अंतर्भूत असू शकतील. खंड (२):- अनुच्छेद ३६८ च्या प्रयोजनांकरिता पूर्वोक्त असा कोणताही कायदा या संविधानाची सुधारणा असल्याचे मानले जाणार नाही. प्रथमदर्शनी या अनुच्छेद-४ ची कायदेशीर भाषा समजण्यास आपणास थोडी अवघड वाटते. परंतु, आपण जर ते काळजीपूर्वक वाचले, तर ते आपल्या लक्षात येण्यास सोईस्कर होते. थोडक्यात अनुच्छेद-४ चा भावार्थ समजून घेऊया. आपल्या राज्यघटनेतील अनुच्छेद-२ व ३ चा वापर करून संसद कायद्याद्वारे जेंव्हा नवीन राज्य स्थापन करेल किंवा आहे त्या राज्यांच्या सीमा अथवा नावात काही बदल करेल,



भाग -१४

तेव्हा 'पहिल्या व चौथ्या अनुसूचित' देखील त्या अनुषंगाने बदल करण्याची तरतूद ह्या अनुच्छेद-४ च्या खंड (१) मध्ये करण्यात आलेली आहे.

आता 'पहिल्या अनुसूचित' आपल्या देशातील सर्व राज्यांच्या नावांची यादी दिलेली आहे. जर आपण अनुच्छेद-२ किंवा ३ चा उपयोग करून नवीन राज्याची निर्मिती केली किंवा नावात अथवा क्षेत्रात बदल केला, तर त्यांच्या नावाचा समावेश पहिल्या अनुसूचित करण्यात येईल, हा झाला पहिल्या अनुसूचीतल्या बदलाचा अर्थ. चौथ्या अनुसूचित राज्यांना राज्यसभेतील प्रतिनिधित्व संदर्भात मिळणाऱ्या जागांची वाटणी करण्यात आलेली आहे. जर अनुच्छेद-२ किंवा ३ च्या माध्यमातून नवीन राज्य स्थापन झाले किंवा आहे त्या राज्याच्या क्षेत्रात बदल झाला, तर त्यांच्या राज्यसभेतील जागांमध्ये देखील फरक पडेल. राज्यसभेतील राज्याच्या प्रतिनिधित्व संदर्भात जागांमध्ये पडलेल्या फरकाची नोंद चौथ्या अनुसूचित करावी लागेल, हा झाला चौथ्या अनुसूचितल्या बदलाचा अर्थ. शिवाय, ह्या अनुच्छेद-४ च्या खंड (२) नुसार, अनुच्छेद-२ व ३ नुसार जी आपण नविन राज्यांची स्थापना किंवा नावात अथवा सीमेत बदल करणार आहोत, ते संविधानाच्या अनुच्छेद ३६८ नुसार संविधानातील 'घटनादुरुस्ती' मानली जाणार नाही. याचा स्पष्टपणे अर्थ असा आहे की, अनुच्छेद-२ व ३ नुसार बनवण्यात येणारे कायदे हे सर्वसाधारण बहुमताने देखील मंजूर करता येऊ शकतात. त्यासाठी विशेष बहुमताची आवश्यकता नाही.

# 'पुरुषी' मनात दडलेला 'विषाणू': भय इथले संपत नाही



आशिष निनगुरकर
मो. 9022879904

आधुनिक केसरी

**रस्ते, बस स्थानके, रेल्वे स्थानके, उद्याने आणि अन्य सर्व सार्वजनिक स्थळे सर्वांसाठी खुली आहेत. त्यांचा आनंद सर्वजण घेऊ शकतात. मात्र, अनेक स्त्रियांसाठी ही छळाची ठिकाणे ठरतात. स्त्रियांच्या संचाराच्या तसेच व्यक्ती म्हणून प्रतिष्ठेच्या मूलभूत हक्कावर दररोज गदा आणली जात आहे.सीमा रस्त्यावरून चालत असते, तेव्हा एक पुरुषांचा समूह तिच्या चेहऱ्यावर व बांध्यावर टिप्पणी करतो. 'वा! काय फिगर आहे!' 'बत्तीस असेल की छत्तीस?' सीमा या आगाऊ टिप्पणीकडे दुर्लक्ष करून चालत राहते. टिपण्या अधिक अश्लाघ्य होत जातात. ते तिला 'बिच' म्हणतात.सुधा बससाठी रांगेत उभी आहे. अचानक तिला तिच्या छातीवर हात पडल्यासारखा वाटतो. ती आजूबाजूला बघते पण हे नेमके कोणी केले ते तिला ते कळत नाही. तिला आपल्या खासगी मर्यादेत अतिक्रमण झाल्यासारखे वाटते पण काही बोलण्याची हिंमत तिला होत नाही.**

*(मागील अंकावरून)*

त्याचप्रमाणे भारतीय दंडसहितेच्या कलम १२५ अंतर्गत मिळणाऱ्या पोटगी व्यतिरिक्त, अतिरिक्त पोटगी, स्वतःसाठी तसेच स्वतःच्या अपत्यासाठी मागता येते. या कायद्यांतर्गत कौटुंबिक हिंसाचाराने पीडित पत्नी, सासू, बहिण, मुलगी, अविवाहित स्त्री, आई, विधवा इत्यादी म्हणजे लग्न, रक्ताचे नाते, लग्न सदृश्य संबंध (लिव्ह इन रिलेशनशीप), दत्तकविधी अशा कारणाने नाते संबंध असणाऱ्या व कुठल्याही जाती धर्माच्या स्त्रिया तसेच त्यांची १८ वर्षाखालील मुले दाद मागू शकतात. या कायद्यांतर्गत छळ होत असलेली किंवा झालेली स्त्री सरंक्षण अधिकाऱ्याला, सेवा पुरविणाऱ्या संस्थांना, तसेच पोलीस स्टेशन किंवा दंडाधिकाऱ्याकडे तोंडी किंवा लेखी तक्रार करु शकते. 'लॉकडाउन संपेपर्यंत माझ्या घराऐवजी दुसरीकडे कुठेतरी राहण्याची माझी सोय करा,' असा इ-मेल एका महिलेने राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष रेखा शर्मा यांना केला आणि लॉकडाऊनमधील सुखी कुटुंबाचे भारतीय वास्तव उघड झाले. 'घरातल्या मारहाणीला मी कंटाळले आहे. पोलिसांकडे तक्रार करूनही काही उपयोग नाही. कारण, पोलिसांनी नवऱ्याला पकडून नेलं, तरी सासरचे लोक माझावर अत्याचार करतीलच. त्यापेक्षा मीच घरात थांबत नाही', असं या तक्रारीत तिने म्हंटलं आहे.खरंतर या अशा गोष्टी कोरोना येण्याच्या आधीही होत होत्याच. काही महिला घर सोडून जाण्याचा प्रयत्नही करत. माहेरी जाऊन राहत. पण कोरोनाच्या साथीमुळे काही महिलांना घरीच थांबून, नवऱ्याचा अत्याचार सक्तीने सोसावा लागतोय. जाणार तरी कुठे? तोंड दाबून बुक्क्यांचा मार! असंच एक उदाहरण स्वातीचं. घरोघरची कामं करून दोन पैसे कमावणारी स्वाती. नवरा हॉटेलात कामाला. कोरोनामुळे या दोघांचंही काम बंद झालं आणि दोघांना घरी राहावं लागलं. काही दिवसांतच तिला नवऱ्याची मारहाण सुरु झाली. पूर्वीही तो कधीतरी हात उचलायचा. पण आता तर रोजच. रोजचा मार आणि शिवीगाळ. स्वातीचं जगणं असह्य झालंय. स्वतीच्याच शब्दात सांगायचे, तर 'सरकारला काय जातंय म्हणायला, की लोक घरी बसून आनंदात चहा पितायेत. रामायण बघतायेत. कधीतरी माझ्या घरी येऊन बघा- रोजचं एक रामायण चालू असल्याचं दिसेल. कोरोना आणि त्यामुळे सुरु झालेल्या लॉकडाउनच्या काळात वाढलेला महिलांवरील घरगुती हिंसाचार, याविषयी वाचायला, शोधायला सुरुवात केली आणि अस्वस्थता आणि विषण्णता हरेक पावलागणिक वाढत गेली. वेगवेगळे आर्थिक-सामाजिक स्तर, जगण्याच्या अत्यंत भिन्न रीती असं सगळं एकीकडे असतानाही घराच्या चार भिंतींच्या आत बाईवर होणारा अत्याचार मात्र जवळपास सगळीकडे एकसारखाच आहे. एरवी एखादी मोलकरीण आणि आयटी क्षेत्रात काम करणारी एखादी संगणक अभियंता यांच्यात काय साम्य असणार आहे? पण, हे दोन एकमेकांशी कधीही जोडले न जाणारे बिंदूही कोरोनामुळे मात्र जोडले गेल्याचं दिसून आलं, ते माझ्याच एका मैत्रिणीमुळे. आयटीत काम करणारी ही मैत्रीण. लॉकडाऊनमध्ये 'वर्क फ्रॉम होम' करून आपला जॉब सांभाळतेय. घरी नवरा, सासु, सासरे, मुलं या सगळ्यांची कामं सुद्धा एकटीनेच करतीय. सर्वांच्या नाश्त्यापासून रात्रीच्या जेवणापर्यंत सगळी कामं आणि त्यापुढे रात्री उशिरापर्यंत जागून ऑफिसचंही काम. एवढं करून सकाळी उठायला थोडाही उशिर झाला, की घरातल्यांची कुरकुर सुरु. या रोजच्या मानसिक त्रासाचा निचरा तिने कुठे करायचा? इथे शिकलेली असो किंवा न शिकलेली, प्रत्येकीची अवस्था हीच आहे. खरंतर, अनेक महिलांना घराच्या चार भिंतींच्या आत घुसमट, हिंसाचार नेहमीच सोसावा लागतो, मात्र



लॉकडाऊनमध्ये हे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. काही महिलांना रोज गुरासारखे मारले जात आहे. आपल्या मुलीच्या अफेअरबदल कळल्यावर तिला तिचा 'सुशिक्षित' बाप दररोज मानसिक आणि शारीरिक त्रास देत आहे. भारतातच नव्हे, तर दूर फ्रान्समध्ये राहणाऱ्या मारियावर रोजच्या रोज स्वतःच्या पतीकडून बलात्कार होत आहे. ही काही प्रातिनिधिक आणि वास्तवातली उदाहरण आहेत.लॉकडाउनच्या निवांत काळात सिरीयात आणि अगदी तिकडे अमेरिकेत, ऑस्ट्रेलियात आणि आपल्या आजूबाजूलासुद्धा अशी शेकडो, हजारो उदाहरणं रोज घडत आहेत. 'हरकत नाही लॉकडाउन झालं तरी. निदान त्या निमित्ताने घरातले सगळेजण एकत्र तरी आलेत. छान वेळ तरी घालवतील', "त्यानिमित्ताने सगळे कुटुंब एकत्र असेल', कुटुंब व्यवस्था मजबूत होईल', अशी गोडगोड स्वप्नही अनेकांनी पहिली आणि सोशल मिडीयावरून फिरवलीही! पण बाहेर सर्वांच्या जीवावर कोरोना उठला असून, काही घरांमध्ये मात्र बायकांच्या जीवावर पुरुष उठले आहेत, हे भयावह वास्तव आपल्या पुढ्यात आहे. कोरोनाच्या या काळात महिलांवर केला जाणारा हिंसाचार, हा फक्त अशिक्षितांमध्ये नाही तर सुशिक्षितांमध्येही तेवढ्याच प्रमाणात बघायला मिळतोय. मग ती रोजंदारीवर काम करणारी लोकं असो, व्यसन केल्याशिवाय झोप न येणारं कुणी असो किंवा मग उच्चभ्रू कुटुंबातील 'महिलांनी आपली मतं मांडू नयेत', असा विचार असणारा कुणी, हे सारेच महिलांवर घरी बसून राग काढणं, त्यांना मारणं हा आपला जन्मसिद्ध अधिकार समजत असल्याचं पाहायला मिळतंय. महिलांवर वाढलेला अत्याचार ही समस्या शब्दशः जागतिक आहे. कोरोनाने सर्वाधिक मानवी मृत्यू झालेल्या देशांपैकी एक असणाऱ्या इटलीतही महिला सुरक्षित राहिलेल्या नाहीत. इटली हा एक पुढारलेला समाज म्हणून ओळखला जातो. पण तिथेही महिलांना पुरुषांच्या अत्याचाराला सामोरे जावं लागतंय. यावर उपाय म्हणून आता इटली सरकारने एक अँप लाँच केलंय, जिथे फक्त महिला मेसेज करून तक्रार नोंदवू शकतात. जो पुरुष घरातल्या महिलेवर हिंसाचार करेल त्याला घराबाहेर जावं लागेल आणि ती महिला आपल्या मुलांबरोबर घरी थांबेल, अशी व्यवस्थाच तिथल्या सरकारने केलीय. एका वर्षाच्या तुलनेत इटलीमधील स्ट्रेस कॉल २० टक्याने अधिक वाढले आहेत आणि व्हॉट्सअॅपवर महिलांकडून पाठविल्या जाणाऱ्या समस्यांच्या संदेशांत देखील २० टक्के वाढ झाली आहे, असं इटली सरकारने प्रसिध्द केलंय. स्पेनमध्ये पोलिसांनी घरी अडकलेल्या महिलांसाठी व्हॉट्सअॅप सेवा सुरू केली आहे. नवरे घरी असताना त्यांच्याबाबतच्या तक्रारी फोन कॉल करण्याची आवश्यकता न पडता नोंदवता याव्यात, यासाठी महिलांकरिता असणारी ही सुविधा तयार करण्यात आली आहे. स्पेनच्या पोलिसांच्या म्हणण्यानुसार (समतेसाठी कार्यरत असणारे मंत्रालय) लॉकडाऊन सुरू झाल्यापासून त्यांच्या कामाची व्याप्ती, समुपदेशन आणि स्त्री-पुरुष समतेच्या प्रश्नांच्या सल्लामसलतीत तब्बल २७० टक्क्यांनी वाढ झाली आहे. स्पेनमधीलच प्रसिद्ध अशा 'मुखवटा' मोहिमेप्रमाणेच, घरगुती हिंसाचाराला बळी पडलेल्यांना मदत मागता यावी यासाठी आणि त्यांच्या शेजाऱ्यांना व अधिकाऱ्यांना सतर्क करण्यासाठी पीडितांच्या तळहातावर लाल ठिपका काढण्यास सांगितलं आहे. फ्रान्समध्येही महिला हिंसाचार ३० टक्क्यांनी वाढला आहे. त्यावर उपाय म्हणून फ्रान्स सरकारने तिथे मोठ्या प्रमाणात समुपदेशन केंद्रे सुरु केली आहेत. हिंसाचार पीडित महिलांसाठी तेथील हॉटेलांत वीस हजार बेडची सोय करण्यात आली आहे. महिलांसाठी फार्मसीत जाऊन तक्रार करता येण्याची सुविधाही आहे. तर, जिथे कोरोनाची सुरुवात झाली, अशा चीनमध्ये कोरोनानंतर घटस्फोटाच्या प्रमाणात मोठी वाढ झाल्याचं दिसून येत आहे. तिथल्या हुबेई शहरात घरगुती हिंसाचारात लॉकडाऊन दरम्यान तिप्पटीपेक्षा अधिक केसेस नोंदल्या गेल्या असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

ब्रिटनच्या गृहमंत्री प्रीती पटेल यांनी हिंसाचाराला बळी पडणाऱ्या महिलांना लॉकडाऊनच्या काळातही घर सोडण्याची मुभा दिली होती आणि महिला हिंसाचाराच्या विरुद्ध उभं राहणाऱ्या स्थानिक स्वयंसेवी संस्थाना मदत करण्याचीही घोषणा केली होती. जपान सरकारने अत्याचारपीडित महिलांसाठी स्वतंत्र अपार्टमेंटची सोय केली आहे, जिथे त्या राहू शकतात किंवा काम करू शकतात,असे सांगितले होते. अशी अंगावर काटा आणणारी उदाहरणं अनेक आहेत. महिलांच्या बाबतीत होणाऱ्या घरगुती हिंसाचारासाठी कायदा काय करू शकतो, हेही पाहणं महत्त्वाचं आहे. भारतीय दंड विधानातील कौटुंबिक हिंसाचार कायद्यातील कलम ३ नुसार 'कौटुंबिक हिंसाचारा'ची व्याख्या चार प्रकारांत करण्यात आली आहे. १) शारीरिक गैरवर्तन २) लैंगिक गैरवर्तन ३) शाब्दिक व भावनिक गैरवर्तन ४) आर्थिक गैरवर्तन, हे ते प्रकार. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हेनुसार २४% महिला आपल्या आयुष्यात कधी न कधी हिंसाचाराच्या बळी ठरलेल्या आहेत. यात बऱ्याचशा उच्चभ्रू महिलांचा समावेश नाही, ज्या आपल्या कुटुंबाची प्रतिष्ठा जपण्यासाठी हिंसाचाराच्या तक्रारी नोंदवतच नाहीत. वर्ल्ड बँकेच्या एका अहवालानुसार महिला सबलीकरणासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम राबविण्यात येत असले, तरीही अत्याचार रोखण्यात हवं तसं यश अजूनही येत नाही. आजही ३५% स्त्रिया लैंगिक शोषणाच्या बळी जात आहेत आणि ते ही आपल्या साथीदारांकडून! एक लाखात जवळपास ६० हजार महिला ह्या घरगुती हिंसाचाराच्या बळी असतात, ही सांख्यिकी नुसती बघितली तरी या समस्येची तीव्रता लक्षात येईल. यात बदल घडण्यासाठी अर्थातच, कायद्याची अंमलबजावणी आणि महिलांमधील जागरूकता अशा दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या ठरतील. महिलांच्या या समस्यांवर काम करायचं असेल, तर सगळ्यात आधी महिलांनी स्वतःहून पुढे येऊन त्यांच्यावर होणाऱ्या हिंसाचाराच्या तक्रारी नोंदवाव्या लागतील. आजही महिलांना त्यांच्यावर हिंसाचार होतोय हे कळत नाही. अनेक घरांत नवऱ्याने मारलेली एक थोबाडीत म्हणजे हिंसाचारच आहे, हेच कित्येक जणींना कळत नाही. एक थोबाडीत ही हिंसाचाराची सुरुवात आहे, हे जेव्हा महिलांना कळेल आणि पटेल, तेव्हा बदलाची सुरुवात होईल. महिला अत्याचारांत होणारी वाढ थांबवायची असेल, तर पुरुषांचं समुपदेशनही तेवढंच महत्त्वाचं आणि गरजेचं. आजही पुरुषांची मानसिकता बदलण्यासाठी, त्यांना महिलांच्या विषयी अधिकाधिक सजग करण्यासाठी फारसे कृतीशील प्रयत्न होताना दिसत नाहीत. संपूर्ण समाज म्हणून आपण त्याकडे कसं पाहतो, यावर या प्रश्नावर उत्तरं मिळण्याचा वेग ठरणार आहे . महिलांचं आर्थिक-सामाजिक स्वावलंबत्व, पुरुषांचं महिलांच्या अस्तित्वाविषयी आणि हक्कांविषयी जागृत झालेलं भान आणि या दोहोंना परस्परांच्या विषयी असणारा आदर, ही त्रिसूत्री आकारात आली तरच कदाचित या चार भिंतीच्या आत दडलेल्या या हिंसाचाररुपी 'विषाणू'वर काही उपाय निघू शकेल. स्त्रीला तिच्या 'स्त्री' असण्यामुळे ज्या विविध समस्यांना तोंड द्यावे लागते, त्या स्त्री समस्या. स्त्रीला निसर्गता काही वैशिष्टयपूर्ण शारीरिक आणि मानसिक रचना कामलेली आहे. विशिष्ट शारीरिक ठेवण, मासिक पाळी, गर्भधारणेची क्षमता, अपत्य संगोपनाची स्वाभाविक जबाबदारी इत्यादी वैशिष्ट्यांनी युक्त असे शरीर आणि वात्सल्य, श्रद्धा, हळवेपणा, कोमलता, हेवा-असूया, अपत्याकांक्षा इत्यादीचे प्रमाण पुरुषांपेक्षा अधिक असलेली मानसिक घडण स्त्रीला लाभलेली आहे, असे मानले जाते. नैसर्गिक वैशिष्टयांमुळे स्त्रीच्या काही खास समस्या निर्माण होत असतात. या समस्या गौण असून त्या सोडवणे अवघड नाही. खेरीज निसर्गाविरुद्ध तक्रार कुणाकडे करणार? मात्र पुरुषांचा स्त्रियांकडे पाहण्याचा सदोष व मतलबी दृष्टिकोन आणि अन्याय्य पुरुषी मूल्यांचा समाजाने (त्यात स्त्रियाही येतात!) केलेला स्वीकार यांतून निर्माण झालेल्या सामाजिक समस्या अत्यंत गहन आणि गंभीर आहेत. पुरुषप्राधान्य आणि पुरुषश्रेष्ठत्व यांच्या आधारावर मोठ्या धोरणीपणाने, चाणाक्षपणाने रचण्यात आलेली समाजव्यवस्था एकूण लोकसंख्येच्या निम्म्याने असलेल्या स्त्री-वर्गावर घोर अन्याय करीत आहे. या समाजव्यवस्थेत स्त्रीचे भयानक शोषण होत आहे. तिची अवस्था दयनीय आहे. तिला भयग्रस्त अवस्थेत जगावे लागते. स्त्री-पुरुषांतील विषमता धक्का देणारी आहे. स्त्रीचा काहीही दोष नसता तिची 'बेअब्रू' होण्याचा धोका या अवस्थेत आहे. या व्यवस्थेमध्ये स्त्रीला 'स्त्री' असण्याचा अभिमान वाटावा अशी स्थिती नाही. उलट स्त्री जन्माबद्दल खंत वाटावी, अशी अवस्था आहे.

आज स्त्रीची अवस्था अत्यंत दयनीय आहे. समाजजीवन आणि कुटुंबजीवन या दोन्ही क्षेत्रांत तिला कनिष्ठ दर्जाच आहे. तिच्या कर्तृत्वाचे आणि श्रमाचे योग्य चीज होत नाही. तिच्या व्यावसायिक श्रमांना बऱ्याच वेळा योग्य 'मोल' मिळत नाही. घरामध्ये गृहिणीला स्वयंपाकीण, मोलकरीण यांच्यापेक्षा अधिक मान नसतो. जन्मापासून मृत्यूपर्यंत स्त्रीच्या वाट्याला परावलंबनच असते. पुरुषाची सावली होऊनच तिला जगावे लागते. लता वृक्षाच्या आधाराशिवाय राहू शकत नाही, तद्वत स्त्रीचे आहे असे मानण्यात येते. त्यामुळे वयात आलेल्या स्त्रीने विवाहाशिवाय रहाणे हा टीकेचा, चर्चेचा विषय ठरतो. 'चूल आणि मूल' हेच तिचे योग्य कार्यक्षेत्र आहे असे सांगितले जाते.

त्यामुळे जीवनाच्या अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये तिला सुखा-सुखी प्रवेश मिळत नाही. 'सहचारिणी' म्हणून गौरविली जाणारी पण बऱ्याचवेळा पुरुषाची केवळ भोगदासीच असते. तिची इच्छा असो वा नसो पुरुषाची कामवासना पूर्ण करणे हे तिचे धार्मिक, नैतिक (आणि कायदेशीरही!) कर्तव्य मानण्यात येते. 'स्त्री'ला व्यक्ती म्हणून स्वतःचे असे काही वेगळे स्थान असले पाहिजे, याची जाणीव समाजात फारच कमी दिसते. द्रव्यार्जन हा मुख्यतः पुरुषांचाच प्रांत आहे, असा समज रूढ असल्यामुळे कुटुंबाच्या आर्थिक अडचणीच्या अपरिहार्यते खेरीज स्त्रीला द्रव्यार्जनाची स्वतंत्र संधी फारशी मिळत नाही. मिळते तेथे बऱ्याच वेळा कामाचा मोबदला (पुरुषांच्या तुलनेने) कमी मिळतो. खेरीज आपण स्वतः मिळविलेला पैसा खर्च करण्याचे तिचे स्वातंत्र्य अत्यंत मर्यादित असते. 'घरकाम' हा स्त्रीचा पारंपरिक व्यवसाय! पण तिच्या, घरातील श्रमांची पैशामध्ये किंमत केली जात नाही आणि म्हणूनच त्यांचे फारसे महत्त्व मानले जात नाही. **क्रमशः**

# दारी अंगणी लाविलं रोप वाढलं का बाई ? त्याच्या बुडाचं कैचन कुणी काढलं का बाई ?

## संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील, भोकर



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : २७

आधुनिक केसरी

**केज तालुक्यातील 'उंदरी' हे गाव जसं अधुनिक डाळींब शेतीसाठी मराठवाड्याच्या नकाशावर आलेलं आहे तसंच ते आता 'कर्मयोगी बालासाहेब ठोंबरे पाटील प्रतिष्ठानच्या दोन दिवशीय स्मृती समारोहा'मुळंही नजरेत भरतं आहे. मराठवाडा कृषी विद्यापिठाचे कुलगुरु आणि विद्वान प्राध्यापक, वैज्ञानिक यांचं कृषी विषयक मार्गदर्शन, मराठवाड्यातल्या विविध क्षेत्रातील प्रतिभावंतांचा वैविध्यपूर्ण पुरस्कारांनी सन्मान, आणि आदल्या दिवशी सायंकाळी 'कृषी आणि सामाजिक सलोख्याच्या कवितांची मौलिक मैफिल' अर्थात 'कविसंमेलन' ही उंदरीकर आणि धारुर, आडस आणि भवतालातील गावांसाठी पर्वणी ठरलेली गोष्ट. निमित्त असतं 'कर्मयोगी कै. प्राचार्य बालासाहेब ठोंबरे पाटील यांच्या स्मृतीचा जागर' जो प्रतिष्ठाणच्या वतीने मागील आठ वर्षापासून घातला जातो आहे. हा अद्भुत अपूर्व सोहळा गाव पातळीवर 'नातं जपणारा, नात्याच्या रेशीमगाठी बांधणारा, भावंडांची माया-ममता वृद्धींगत करणारा, एकत्र कुटुंब पद्धतीचं अपूर्व समर्थन करणारा प्रेम जिव्हाळ्याचा सोहळा असतो'. प्रतिष्ठानच्या सर्व सज्जन पदाधिका-यांसह स्व. बालासाहेब ठोंबरे सरांचे कर्तव्यदक्ष धाकटे बंधू प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे आणि अवघं गणगोत एकजिवानं हा स्मृती सोहळा अगदीच नीटनेटका आणि सुनियोजनानं नटवून घडवून आणतात, असा जिव्हाळा परीसरात पहायला मिळंत नाही.**

या कविसंमेलनाचा पाया आमचे सन्मित्र कविवर्य राजेसाहेब कदम जे बाबासाहेब ठोंबरे सरांचे साडू आहेत आणि कवी जनार्धन सोनवणे ज्यांचे बाबासाहेब ठोंबरे सर दाजी आहेत आणि मुख्याध्यापक गिन्यानदेव गदळे सर,हनुमंत घाडगे गुरुजी, हनुमंत भोसले सर,हनुमंत सैदागर, बालाजी मुंडे, अनिल चवळे आणि मी अर्थात मुकुंद राजपंखे अशा सगळ्यांनी रचला. उंदरीच्या 'कर्मयोगी बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या' मागील आठ वर्षाच्या परंपरे नुसार वर्षीही दि.१८ मे २०२३ रोजी सायंकाळी स्मृती समारोहाची सुरुवात कविसंमेलनानेच झाली. या वेळी कविसंमेलनाचे समन्वयक होते कविवर्य जनार्धन सोनवणे आणि निमंत्रक होत्या कवयित्री अनुराधा सूर्यवंशी (ठोंबरे), या कविसंमेलनाचं बहारदार समयोचित सूत्रसंवाद कवी राजेश रेवले आणि कवी गोरख शेंद्रे यांनी केले. या कविसंमेलनात मुकुंद राजपंखे, रंगनाथ काकडे, राजेंद्र रापतवार, राहूल गदळे, पांडुरंग वागतकर आणि उपस्थितांमधून उत्सफुर्तपणे कु. क्रांती गायकवाड, कु. अंकिता ठोंबरे यांनीही आपल्या कविता उपस्थितांना ऐकवून वातावरण आनंदीत केले.

**कवी राजेश रेवले(नैकोटकर) :**
कवी राजेश रेवले यांनी आपल्या सुंदर काव्यवाचन शैलीत आपली आई-वडीलांबद्दलअपार श्रद्धा व्यक्त केली.आईचं वात होवून गृहगाभा-याला उजळून टाकणं आणि बापाच्या गृहमंदिराचा कळस होणं अशा सुंदर प्रतिमांनी आईचं मोठेपण अधोरेखीत केलं. "माय बोंडं फुलं पातं, माय कापसाची वातनवी आशा फुलवती, माय बापाच्या मनात ! माय घराचा उंबरा, माय अंगणी तुळस बापाच्या मंदिराची, माय असते कळस !"

**कवी जनार्धन सोनवणे (केज) :**
केजचे जेष्ठ कवी जनार्धन सोनवणे यांनी 'हिशोब' ही कविता ऐकवून शेती आणि शेतक-यांच्या पिढ्यान् पिढ्यांच्या दुःखाला वाचा फोडली.शेती कायम पावसावर विसंबुन राहिल्यामुळं हे दुःख कायम पाचविला पुजलेलंच आहे. या दुःखाची धग शेतक-याला कायम पोळंत राहिलेली आहे.

**"दुष्काळ पडो अथवा सुकाळ होवो,**
**ज्याचा त्याचा हिशोब पटलेला असतो.**
**पाऊस पडो अथवा न पडो**
**शेतकरी राजा मात्र लुटलेला असतो."**

**कवी गोरख शेंद्रे(अंबाजोगाई) :**
कवी गोरख शेंद्रे यांनी भरकटलेल्या तरुणाईला दिशा देताना सुंदर कविता ऐकवली.शाळा महाविद्यालयात शिकताना जर आयुष्याला सुसंसिकारी वळण लागलं नाही तर मुलं हातून सुटतात आणि कुटुंबाच्या जिवाला घोर लागून रहातो.राजकारण त्यांना आकर्शीत करतं आणि लेकरं घडायच्या वयात बिघडून जातात.अशा स्वप्नाळू वयातल्या लेकरांसाठी पुस्तक महत्वाची भूमीका बजावतात.

**"वाचत जा पुस्तक वाचत जा समाज**
**निळ्या भगव्या बरोबर पाडीत जा नमाज.**
**रंगांच्या भेदामध्येच बरबाद झाल्या पिढ्या**
**उगाच कोणाच्या भानगडीत पडू नकोस वेड्या !"**

**कवी मुकुंद राजपंखे (अंबाजोगाई):**
कुठलाही उपक्रम असो नाही तर यौजना सुरु करताना असलेला आनंद, उत्साह शेवटपर्यंत टिकायला हवा आणि त्याची फलनिष्पत्ती व्हायला हवी ही रास्त भूमीका मांडली.वृक्षारोपण केल्या नंतर त्या झाडांची सर्वतोपरी निगरानी करण्याची जबाबदारीही आपलीच समजून पार पाडायला हवी. झाडांसारखा तुकोबाम्हणतात तसा आनंददायी 'सोयरा' नाही याची जाणीव करुन दिली.

**"दारी अंगणी लाविलं रोप वाढलं का बाई ?**
**त्याच्या बुडाचं कैचन कुणी काढलं का बाई ?**
**येता जाता गुरु ढोरं तोंड घालती ल्हाचर**
**काटी कुंपण करुन झाड राखलं का बाई ?**
**जया ओसरी ना वटा नाही अंगणात झाड**
**अशा घरादारामंदी सुख नांदल का बाई ?**
**पान फुलं फळं आणि जन्मभर शुद्ध हवा,**
**झाड सोयरा म्हणाला 'तुका' वाचलं का बाई ?"**

कवयित्री सौ.अनुराधा सुर्यवंशी-ठोंबरे (लातूर) :
कवयित्री अनूराधा सुर्यवंशी-ठोंबरे यांनी कर्मयोगी प्राचार्य बालासाहेब ठोंबरे या आपल्या स्वर्गवासी वडिलांना आपल्या कवितेतून विनम्र अभिवादन केलं. वडीलांच्या स्मृती जाग्या करताना जड अंतःकरणानं त्या म्हणाल्या...

**"आज तुम्ही असता तर जगणं असतं वेगळं**
**आयुष्याची कोडी सोडविणं सोपं असतं**
**सगळं. आज तुम्ही असता तर पुन्हा ऐकता आली**
असती ती नम्र भाषा, कृतीयुक्त मार्गदर्शनाने
तुमच्या प्रत्येकालाच मिळाली असती दिशा.
**आज तुम्ही असता तर कशाचीच नसती उणिव,**
**आपल्या माणसांच्या गर्दीत दुःखाची झालीच**
**नसती जाणीव !"**

**कवी राजेंद्र रापतवार (अंबाजोगाई):**
अंबाजोगाईचे कवी राजेंद्र रापतवार यांनी 'सुंदर नाते निसर्गाचे जपू कृषी धन' ही कविता ऐकवली. शेतक-यांनी आपली शेती बाजाराचा आंदाज घेऊन नियोजनपुर्वक केली तर पिढ्यान् पिढ्याच्या दुःखापासून सुटका होवू शकेल. निसर्गाचा लहरीपणा, नशा आणि कर्जबाजारीपण सोडून वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन करुन शेतीत आनंद निर्मिती करता येवू शकेल ही आशा वाटते.

**"बळीराजाचे वंशज तुम्ही-आम्ही कृषी ज्ञानमंदिर आपुले श्रद्धास्थान, पुन्हा घडवू आपण हरितक्रांती भारत देश करुया विश्वात महान. झुगारून देऊ निसर्गाची मनमानी वृक्षारोपण संवर्धनाची घेऊन हमी ते आता नशा दारूचे नकोच प्राशन, नकोच ऋण- कर्ज योजनेचे प्रलोभन !"**

**कवी रंगनाथ काकडे (बनसारोळा) :**
बनसारोळ्याचे कवी रंगनाथ काकडे यांनी शेतक-याच्या दुःखाला वामन कारणीभूत असल्याचा इतिहास पुनरुज्जीवित केला.स्वाभिमानी शेतक-याची प्रतिमा उभी करताना वामनाशी दोन हात करण्याची तयारी दर्शवून वामनानं एकदा सरळ सरळ समोर येवून दोन हात करावा असं आवाहन केलं आहे. ही खचलेल्या शेतक-यांचं बळ बांधणारी सुंदर रचना होय.

**"शब्द विकणाऱ्यांची जातकुळीनाही आमुचीकष्टकऱ्यांची ही अवलाद आहे मतलबी लवचिकता अंगी नाही आमुच्या. स्वाभिमानाचा ताठ कणा पोलादी आहे. जरी रूप बदलून आजही आलास वामना, डोक्यावर पाय ठेवण्याआधी होऊ दे आणखी एक सामना !"**

**कवी राहुल गदळे(केज) :**
केजचे कवी राहूल गदळे यांनी शालेय शिक्षणानंतर लग्न करुन लेकीबाळी सासरी निघून जातात आणि घरातलं, गावातलं चैतन्य हरवून जातं ही घालमेल गावच्या शाळेला, वडाच्या पारंब्यांना, नद्यांना जाणवल्या शिवाय रहात नाही. **नटून थटून लाजत मुरडत गावात फिरल्या पोरी कुठं हरवल्या पोरी पदर खोचून उंच उंच झोक्यावर आकाशी भिडल्या पोरी कुठं हरवल्या पोरी भर दुपारी वडाखाली सुरपाट्या खेळतानी परंब्यासोबत झुलल्या पोरी कुठं हरवल्या पोरी" दखलपात्र नोंद :**
मागील आठ वर्षा पासून उंदरीकर आणि ठोंबरे कुटुंबियांचं गणगोत आणि आम्हा कवी मंडळीसह या स्मृती समारोहाच्या निमित्तानं शेतीमातीच्या आणि संस्कार-संस्कृतीच्या कविता ऐकत, ऐकवत आलो आहोत. जे लेकरं पहिली दुसरीत होते ते नववी दहावीत आलेत आणि ज्यांचं शाळेचं माध्यमिक शिक्षण सुरु होतं ते लेकरं कॉलेजात शिकत आहेत.या कविसंमेलनात उत्सफुर्तपणे अशा दोन मुलींनी आपल्या चिंतनशील कविता ऐकवून रशिकांची पसंती मिळवली. या दोन कवयित्री आहेत कु. अंकिता ठोंबरे आणि कु क्रांती गायकवाड. या दोन लेकरांच्या कविता हे या उत्सवाच्या संवेदनशील संस्कारक्षम कविसंमेलनाचं फलीत आहे.

**बालकवयित्री कु.अंकिता ठोंबरे(उंदरी) :**
उंदरीची बालकवयित्री कु.अंकिता ठोंबरे ही दहाव्या इयत्तेत शिकणारी मुलगी.मागील आठ वर्षांपासून स्मृती समारोहात कविता ऐकते आहे. तिची या समारोहातली ही कविता या स्मृतीसमारोहातील कविसंमेलनाचे फलित आहे.तिने आपल्या दैनिक आयुष्यातील जगणं आवेशपुर्ण शैलीत सादर केलं. तिने शेतक-यांच्या दुःखाची रचना ऐकवली. या कवितेतून शेतीची दयनीय परीस्थिती असली तरी त्याच्या कष्टामुळं नक्की चांगले दिवस येतील हा सुंदर आशावादही व्यक्त केला. उपस्थितांनी तिच्या कवितेचं कौतूक करत भरभरुन दाद दिली. **"नियती खेळत आहे शेतकऱ्यांबरोबर खेळ थोडा संयम धरा, एक दिवस नक्कीच येईल शेतकऱ्यांची वेळ !"**



**कवयित्री कु. क्रांती गायकवाड(उंदरी) :**
कवयित्री क्रांती गायकवाड यांच्या कवितेतून मुली पहायला येण्याचा प्रसंग मांडत असताना मुलींची होणारी घुसमट मोठ्या बारकाव्यासह टिपली आहे. मुलीचं मन बिचारं या सगळ्या प्रसंगांना सामोरं जाताना किती अवहेलना आणि किती अगतीकतेला सामोरं जात असतं हे नीटपणे बघीतलं तर अशा प्रसंगांचा अडसर विवाह सोहळ्यापुर्वीच्या या उपक्रमांच्या जंजाळातून मुलींची सुटका होईल.बघा ही क्रांतीच्या संवेदनशील मनानं टिपलेले बारकावे...

**"लग्नासाठी पाहुणे तिलाच पहायला येतात. गो-या कातड्याची प्रसंशा करत तिला पसंत करुन जातात. रंग काळा असेल तर परत चक्र फिरंतच रहातं. कांद्या पोह्याच्या तमाशात तिचं मन मात्र करपत जातं. बोलता येतं का हे पाहण्यासाठी नाव विचारलं जातं, सा-यांना तिला अगदी साडीतच पहायचं असतं. अरेच्या साडीत चालता येत नाही परत भुवयाउंचावल्या जातात, पुरणपोळी येत नाही म्हणल्यास नाकही मुरडली जातात. कुणाची तरी पसंत बनन्यासाठी भरलेली असते सभा, स्वतःच्या आयुष्याबद्दल निर्णय घेण्याची नसते तिला कसलीच मुभा."**

**कवी पांडुरंग वागतकर (परभणी) :**
परभणीचे कवी पांडुरंग वागतकर यांनी आपल्या कृषीजीवनविषयक दोन कविता ऐकवल्या. शेतीमातीच्या अर्थपूर्ण प्रतिमांनी समृद्ध भाषा आणि ग्रामसंस्कृतीचा सुवास त्यांच्या कवितांमधून दर्वळत राहिला. आषयसंपन्न कवितांचं सुस्पष्ट काव्यवानचन करताना ते म्हणाले...

**"गोठ्यावरच्या पाचटाला चघळुन, पोटाची आग विझवते गाय, कणगीच्या तळाला घरासाठी भाकर शोधते माय. आठलेल्या विहिरीवर चिखलालाच हूंगते गाय, हांडाभर पाण्यासाठी रान धुंडाळते माय." अध्यक्ष ज्ञानदेव वाकुरे (परभणी)**
: कविसंमेलनाचा समयेचित समारोप सेवानिवृत्त जिल्हा अधिक्षक,कृषी अधिकारी मा.ज्ञानदेव वाकुरे यांनी स.ग.पायपोळ यांची सुप्रसिद्ध कविता

**"हंबरुनी वासराला चाटते जवा गाय**
**तवा मले तिच्यामंदी दिसती माझी माय.**
**आया बाया सांगत होत्या जवा मी होतो तान्हा,**
**दुष्काळाच्यामुळं मायीचा आटला होता पान्हा,**
**पिटामंदी पाणी टाकुन पाजत मला जाय."**

ही कविता ऐकवून उपस्थितांना आई आणि लेकरांच्या वात्सल्याचा, मायेचा, प्रेम-जिव्हाळ्याचा परीचय करुन दिला.आईच्या त्याग आणि समर्पणातील मोठेपणाचं दर्शन देणारी ही सुंदर रचना ऐकुन रशीक मंत्रमुग्ध झाले. कै बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती समारोहाच्या आरंभीच्या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त जिल्हाअधिक्षक, कृषी अधिकारी ज्ञानदेव वाकुरे परभणी, जेष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा काका, महाराष्ट्र राज्य दंत परीषदेचे अध्यक्ष तथा बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचीव डॉ. नरेंद्र काळे, मानवलोक अंबाजोगाईचे कार्यवाह अभिजीत लोहिया ,प्रतिष्ठाणचे सर्व पदाधिकारी, विश्वस्तांसह प्राचार्य डॉ बाबासाहेब ठोंबरे आणि त्यांचं गोणगोत उपस्थित होते. या काव्यमैफिलीचं प्रास्ताविक भारत कुरवडे यांनी प्रतिष्ठानच्या कार्याचा इतिहास सांगुन कार्यक्रमाचं मोठेपण विशद केलं.उपस्थित काव्यरशिकांचे आभार उत्सफुर्तपणे उंदरी आणि परीसरातील ठोंबरे परिवाराचं अवघं गणगोत आणि उंदरीचे ग्रामस्थ उपस्थीत होते. महिला आणि तरुणांसह बुजुर्गांनीही या ऐतिहासिक आणि अविस्मरणीय शेती मातीच्या आणि एकुणच संस्कृती संवर्धनाला समर्पीत कविसंमेलनाचा आस्वाद घेतला. उंदरी, ता. केजच्या या परीसरात नावलौकिकास आलेल्या कर्मयोगी कै.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती समारोहासाठी श्रीमती प्रभावती बालासाहेब ठोंबरे (पाटील) जनार्धनराव दादासाहेब ठोंबरे(पाटील) यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनंतराव ठोंबरे, प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, सुदामराव ठोंबरे, बाळासाहेब सूर्यवंशी, सौ.अनुराधा सूर्यवंशी-ठोंबरे, भरतराव ठोंबरे, लालासाहेब ठोंबरे, उत्तरेश्ववर सोनवणे, उंदरी ता. केजचे सर्व ग्रामस्थ, माजी कृषी विद्यार्थी संघ, अंबाजोगाई कृषी महाविद्यालयाचा मित्र परीवार, अंबाजोगाईचा मित्र परीवार, वसंतराव नाईक कृषी विद्यापिठ परभणी येथील मित्र परिवार, नातेवाईक आणि ठोंबरे कुटुंबियांनी पुढाकार घेतला होता.

**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आहेत आणि इंग्रजी भाषा आणि साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत.)**

# लातूरची कन्या सृष्टी जगताप १२६ तास नॉनस्टॉप नृत्याने नेपाळचा विश्वविक्रम मोडणार ?

आधुनिक केसरी

राजू जाधव, मांगूर जि. बेळगाव

सलग २४ तास लावणी नृत्याचा विक्रम करीत आशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झालेली लातूरची कन्या सृष्टी सुधीर जगताप ही अकरावी वर्गातील विद्यार्थीनी येणाऱ्या २९ मे ते ३ जुन दरम्यान सलग १२६ तासांपेक्षा अधिक काळ नॉन स्टॉप नृत्य करुन गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नेपाळच्या नावावर असणारा विश्वविक्रम मोडणारं असल्याची बातमी वाचनात आली. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाअंतर्गत होणाऱ्या सोहळ्यात सृष्टीच्या अनमोल भेटीची सर्वांनाच प्रतीक्षा आहे.सृष्टीने आंतरराष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या कल्चरल ऑलम्पियाडसाठी भारताचे नेतृत्व केले होते. त्यासाठी ती हाँगकाँग आणि दुबई येथील उत्सवात सहभागी झाली होती. यापुर्वी सृष्टीने राज्य आणि देशपातळीवर अनेक स्पर्धा जिंकल्या आहेत. टिव्ही वाहिन्यांवरील दम दमा दम, महाराष्ट्राचे छोटे डान्सर्स अशा अनेक नृत्य स्पर्धांमध्ये महाविजेतेपद पटकाविले आहे. ती सध्या दयानंद महाविद्यालयात ११ वी विज्ञान शाखेत शिक्षण घेत असून, दहावीत सीबीएसई पॅटर्नमध्ये सेकंड टर्ममध्ये ९९.२ टक्के गुण घेवून भारतात चौथा क्रमांक पटकावला आहे. सृष्टी शास्त्रीय नृत्य कथ्थक विशारद आहे तिला युपीएससी स्पर्धांमधून सनदी सेवेत जायचे आहे. उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता आणि सर्वोत्कृष्ट नृत्य कौशल्य असलेल्या सृष्टीच्या कुटूंबियांनी तिला भक्कम साथ दिली आहे. गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसाठी सर्व प्रक्रिया पूर्ण केली असून, तिच्या नृत्य विश्वविक्रमाचे परिक्षण गिनिज बुक यंत्रणेकडून होणार आहे.सलग पाच दिवस नृत्याचा रेकॉर्ड नेपाळ देशाच्या नावावर आहे. त्यापुर्वी भारतातील सोनी चौरसिया यांच्या नावावर ही नोंद होती. आता सृष्टी पुन्हा हा विश्वविक्रम भारताच्या नावावर नोंदविण्यासाठी सज्ज झाली आहे.

# चीनने काश्मीरवर पुन्हा एकदा गरळ ओकले



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**पुढील आठवड्यात श्रीनगर येथे होणाऱ्या प्रस्तावित जी २० पर्यटन कार्यगटाच्या बैठकीत सहभागी होणार नसल्याचे चीनने स्पष्ट केले आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते वांग वेनबिन म्हणाले की, 'वादग्रस्त भागात' कोणत्याही प्रकारची बैठक घेण्यास चीनचा ठाम विरोध आहे.काश्मीरचा प्रश्न सयुक्त राष्ट्राच्या ठरावानुसार सोडविला गेला पाहिजे, असा पुनरुच्चार करत चीनने पाकिस्तानचा बचाव करता काश्मीरवर जहर उगलले. भारत २२ ते २४ मे दरम्यान श्रीनगरमध्ये तिसऱ्या जी २० पर्यटन कार्यगटाचे आयोजन करणार आहे. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी बुधवारी सांगितले की, श्रीनगरमधील जी-२० बैठक ही जम्मू-काश्मीरसाठी आपली खरी क्षमता दाखवण्याची उत्तम संधी आहे.**

चीनने परत एकदा जम्मू काश्मीरचा विवादित प्रदेश म्हणून उल्लेख करत गरळ ओकली. चीन हा पाकिस्तानचा जवळचा मित्र आहे. श्रीनगरमधील या कार्यक्रमामुळे देश आणि जगाला सकारात्मक संदेश जाईल, असे ते म्हणाले. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते वांग वेनबिन यांनी एका पत्रकार परिषदेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, "विवादित भूभागावर कोणत्याही प्रकारचीजी २० बैठक घेण्यास चीन ठाम विरोध करतो. आम्ही अशा बैठकांना उपस्थित राहणार नाही. पाकिस्तान आणि चीनने यापूर्वीही जम्मू-काश्मीर केंद्रशासित प्रदेशाबाबत वक्तव्ये केली आहेत. या दोन्ही देशांचे वक्तव्य भारताने फेटाळून लावले आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या वतीने असे सांगण्यात आले की, "आम्ही सातत्याने अशी विधाने नाकारली आहेत आणि संबंधित सर्व पक्षांना या प्रकरणांवर आमची स्पष्ट भूमिका माहीत आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाख हे भारताचे केंद्रशासित प्रदेश अविभाज्य भारताचेभारताचे भाग आहे. आणि नेहमीच असतील. इतर कोणत्याही देशाला यावर भाष्य करण्याचा अधिकार नाही. २०२० मध्ये पूर्व लडाखच्या गलवान खोऱ्यात भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये हिंसक चकमक झाली होती, त्यानंतर दोन्ही देशांमधील संबंध तणावपूर्ण बनले होते. जोपर्यंत सीमा भागात शांतता नाही तोपर्यंत द्विपक्षीय संबंध सामान्य होऊ शकत नाहीत, असे भारताने म्हटले आहे. यापूर्वी पाकिस्तानने जम्मू-काश्मीरमध्ये जी-२० आयोजित करण्याच्या भारताच्या योजनेलाही विरोध दर्शवला होता. पाकिस्तानने काश्मीरमध्ये जी-२० आयोजित करण्याचा भारताचा प्रयत्न नाकारल्याचे म्हटले होते. कायदा



आणि न्यायासाठी जी-२० सदस्य देश या प्रस्तावाला स्पष्टपणे विरोध करतील अशी आशा आहे, असे पाकिस्तानच्या वतीने सांगण्यात आले. दरम्यान, जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ले वाढल्यामुळे जी-20 परिषदेपूर्वी या भागात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. या वर्षात आतापर्यंत झालेल्या चार हल्ल्यांमध्ये १० सैनिक आणि ७ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. भारतीय नौदलाचे मरीन कमांडो श्रीनगरच्या दल सरोवरात स्पीड बोटीतून गस्त घालत आहेत. त्याच वेळी, काउंटर इन्सर्जन्सीमध्ये खास असलेले ब्लॅक कॅट कमांडो श्रीनगरच्या लाल चौक परिसरात तैनात आहेत. याशिवाय विशेष दले, भारतीय लष्कर, निमलष्करी दल आणि पोलीसही हाय अलर्टवर असून संपूर्ण राज्याची सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

# जागतिक कासव दिन



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**२३ मे हा दिवस संपूर्ण जगात जागतिक कासव दिन म्हणून साजरा केला जातो. १९९० पासून हा दिवस संपूर्ण जगात साजरा केला जातो. आपल्या संस्कृतीत कासवाला खूप मानाचे स्थान आहे. हिंदू संस्कृतीत तर कासवाला देवाचे रूप मानले जाते. हिंदू धर्माच्या मंदिराच्या बाहेर तर कासवाची प्रतिकृती आवर्जून असते. देवाचे दर्शन घेण्याआधी भाविक कासवाचे दर्शन घेतात. आपले पूर्वज कासवाचा सांभाळ करत असत. प्रत्येक नदी, विहीर, बारव तलावात कासव वास्तवात असे, पण आज कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. कारण शिकार, व्यापार आणि पाण्याच्या अभावामुळे कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. अनेक दुर्मिळ जातींच्या कासवांचे अस्तित्व नष्ट झाले आहे.**

आज गोड्या पाण्यातून तर कासवे हद्दपारच झाले आहेत. कासवांचे अस्तित्व आता फक्त समुद्रातच पाहायला मिळते. कासव हा उभयचर प्राणी आहे. पाणी आणि जमीन अशा दोन्ही ठिकाणी कासव राहू शकतो. कासवाचे पोट आणि पाठ खूप टणक असते. समुद्रात राहणाऱ्या कासवाचे सात प्रकार आहेत त्यापैकी भारतात चार प्रकार पाहायला मिळतात. ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन टर्टल, हॉक्स बिल टर्टल आणि आणि सागरी कासव हे ते चार प्रकार आहेत. ऑलिव्ह रिडले कासव हे तपकिरी रंगाचे असून ते महाराष्ट्र आणि ओरिसाच्या समुद्रकिनाऱ्यावर आढळतात. ग्रीन टर्टल कासव म्हणजे हिरव्या रंगाचे कासव हे पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर आढळतात. हॉक्स बिल टर्टल म्हणजे चोची सारखे तोंड असलेले कासव अंदमान निकोबारच्या बेटावर आढळतात तर सागरी कासव हे सर्व समुद्रात



आढळतात. समुद्रातील कासवांची देखील आता मोठ्या प्रमाणात शिकार होऊ लागली आहे. कासवांच्या पाठीचा दागिन्यांसाठी वापर केला जातो. तसेच कासवांच्या पाठिपासून ढालीही बनवल्या जातात. चामड्याच्या तसेच शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी कासवांच्या त्वचेचा वापर केला जातो. काहीजण आपल्या घरात शोभेसाठी कासव पाळतात. या सर्व कारणांनी कासवांची शिकार होते. कासवांची शिकार बेकायदेशीर असूनही कासवांची शिकार होते हे विशेष. कासवांचे संवर्धन करण्यासाठी वेळास येथे कासव संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. वेळास येथे दरवर्षी कासव महोत्सवही आयोजित केला जातो. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑलिव्ह रिडले कासवांचे प्रजनन आणि संवर्धन होते. कासवांचे आयुष्य १०० ते १५० वर्ष इतके असते. मात्र शिकारीमुळे अनेक कासवे अकालीच मरण पावतात. कासवांचे अस्तित्व जमीन आणि पाण्यातील जीवनसाखळीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. कासवांचे अस्तित्व टिकणे ही काळाची गरज आहे. जर पृथ्वीवरून कासवांचे अस्तित्व नष्ट झाले तर त्याचा पर्यावरणावर मोठा परिणाम होऊ शकतो. कासव हा वन्यजीव असल्याने त्याला घरात बंदिस्त करणे, त्याची हत्या करणे, शिकार करणे हे वन्यजीव कायद्यानुसार गुन्हे आहेत त्यामुळे असे गुन्हे करताना कोणी आढळल्यास त्याची पोलिसांकडे तक्रार करणे हे देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे. कायद्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे, कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हाच जागतिक कासव दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. हा उदेश यशस्वी व्हावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करायला हवे.

# जीवसृष्टीची जैविक विविधता कोणती ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**पूर्वी घराच्या आजूबाजूला वेगवेगळी फळांची व फुलांची झाड लावली जायची जेणेकरून त्यावर पक्षी व फुलपाखरे बागडावीत. पण सद्याच्या स्थितीत पाहिले तर सगळीकडे कॉंक्रीटीकरण वाढलेले आहे. त्यामुळे आजूबाजूला जास्त परिसरच नाही व जेवढा आहे तेवढ्यात वेगवेगळी शोची झाडे लावली जातात. अस जर होत राहीले तर त्या फुलपाखरांनी बागडायचे कुठे? त्यांनी मध कुठे तयार करायचा? असा मानवाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा लेख श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार यांचा जरूर वाचा. जैवविविधता ही पृथ्वीवरील जीवसृष्टीची जैविक विविधता आणि परिवर्तनशीलता आहे.**

जैवविविधता हे जनुकीय, प्रजाती आणि परिसंस्थेच्या पातळीवरील भिन्नतेचे मोजमाप आहे. तलाव, तळे, नदी आदी परिसंस्थेचा अभ्यास करून तेथे पाहण्यात आलेल्या जैवघटकांची माहिती घेतली जाते. त्यात सजीवांमधील विविध जाती, परिसंस्था, बायोम किंवा पूर्ण पृथ्वीवर विविधता आढळून येते. परिसंस्थेमधील विविधता हे परिसंस्थेच्या निकोपपणाचे एकक आहे. ती बऱ्याच प्रमाणात भूभागाच्या हवामानावर अवलंबून असते. उदाहरणार्थ- उष्णप्रदेशीय भागामध्ये जैवविविधता अधिक तर ध्रुवीय भागामध्ये विविधता कमी असते. जैवविविधता पृथ्वीवर समप्रमाणात पसरलेली नाही. त्यांत विस्ताराची विविधता आढळतेच. एवढेच नव्हे तर एकाच प्रदेशामध्ये सुद्धा सारखेपणा आढळून येत नाही. सजीवांमधील विविधता ही तापमान, पडणाऱ्या पावसाचे प्रमाण, समुद्र सपाटीपासूनची उंची, भूप्रदेशाचे गुणधर्म आणि सभोवती असलेले इतर सजीवांचे अस्तित्व यांवर अवलंबून असते. सजीवांच्या देशी जाती व अप्रिसंस्थेच्या वितरणाच्या अभ्यासास जैवभूगोल असे म्हणतात. विषुववृताजवळील उष्णप्रदेशामध्ये विविधता अधिक तर ध्रुवीय प्रदेशामध्ये कमी विविधता आढळते, हे वर आलेच आहे. सन २००६मध्ये आययूसीएन या संस्थेने दुर्मीळ किंवा अस्तित्व धोक्यात आल्याचे जाहीर केलेल्या सजीवांची संख्या ४०,१७७ एवढी होती. वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार अशा जातींची संख्या दहा लाखांवर पोहोचेल. भूप्रदेशावरील विविधता महासागरी विविधतेपेक्षा पंचवीस पटीनी अधिक आहे.

झपाट्याने होणाऱ्या परिसरातील बदलांमुळे सजीव सामूहिकरीत्या लुप्त होतात. एका अंदाजानुसार पृथ्वीवर असलेल्या एकूण सजीवांपैकी एक टक्का सजीव लुप्त झाले आहेत. सजीवांची पृथ्वीवर निर्मिती झाल्यापासून आजपर्यंत पाच वेळा मोठ्या प्रमाणात आणि अनेक वेळा लहान प्रमाणात जैवविविधतेचा नाश झाला आहे. सुमारे चौप्पन कोटी वर्षांपूर्वी फेनेरोझोइक महाकल्पामध्ये जैवविविधतेचा महाविकास कॅम्ब्रियन कल्पामधील विविधतेचा स्फ़ोट या नावाने ओळखला जातो. बहुपेशीय सजीवांमधील सर्व संघांची निर्मिती झालेली होती. त्यांपुढील चाळीस कोटी वर्षांमध्ये जैवविविधतेचा पुन्हा पुन्हा नाश झालेला होता. कार्बोनिफेरस युगामध्ये सदाहरित वनांमधील वनस्पती आणि प्राण्यांचा नाश झाला. पर्मियन ट्रायासिक युगामध्ये पंचवीस कोटी वर्षांपूर्वी झालेला जैवविविधतेचा नाश सर्वात मोठा होता. तीन कोटी वर्षांपूर्वी पृष्ठवंशी सजीवांनी पुन्हा एकदा आपला जम बसवला. साडेसहा कोटी वर्षांपूर्वी झालेला क्रिटेशियस-टर्शरी विनाश हा नजीकच्या काळातील जैवविविधतेचा नाश होय. याच काळात डायनॉसोर नष्ट झाले. जैवविविधतेत माणसाचा प्रवेश झाल्यानंतर ती आणि जनुकीय विविधता हळू हळू नाहीशी होत आहे. यास हॉलोसिन विनाश असे म्हटले जाते. मानवी हस्तक्षेपामुळे अधिवास नष्ट झाल्याने जैवविविधतेचा आतोनात नाश होत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने जैवविविधतेच्या नाशाकडे लक्ष देण्यासाठी इसवी सनाचे २०११-२०२० हे दशक जैवविविधता दशक म्हणून जाहीर केले होते. पूर्वी घराच्या आजूबाजूला वेगवेगळी फळांची व फुलांची झाड लावली जायची जेणेकरून त्यावर पक्षी व फुलपाखरे बागडावीत. पण सद्याच्या स्थितीत पाहिले तर सगळीकडे कॉंक्रीटीकरण वाढलेले आहे. त्यामुळे आजूबाजूला जास्त परिसरच नाही व जेवढा आहे तेवढ्यात वेगवेगळी शोची झाडे लावली जातात. अस जर होत राहीले तर त्या फुलपाखरांनी बागडायचे कुठे ? त्यांनी मध कुठे तयार करायचा ?



आज अस्तित्वात असलेल्या जैवविविधतेमागे ३५० कोटी वर्षांचा इतिहास आहे. सजीवांची नक्की निर्मिती केव्हा झाली ? हे जरी वैज्ञानिकाना सांगता आले नाही तरी पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर वीस ते तीस कोटी वर्षानंतर प्राथमिक रचना असलेले सजीव अस्तित्वात आले, यावर वैज्ञानिक ठाम आहेत. जैवविविधतेमुळे अनेक पर्यावरण सेवा उपलब्ध झाल्या आहेत. या सेवा प्रत्यक्ष नसून अप्रत्यक्षपणे मानवी जीवन सुसह्य बनवतात. हवेच्या घटकांचे संतुलन, गोड्या पाण्याचे चक्र, यांचे मूल्यमापन अशक्य आहे. यामधील जैवविविधतेच्या मदतीचे रुपयात किंवा डॉलरमध्ये मूल्य केल्यास कोणत्याही प्रगत राष्ट्राला ते चुकवता येणार नाही. मृदेमधील अन्नघटक चक्र, सुपीक जमीन तयार करणे, अशी कामे मानवी प्रयत्नांनी करायची ठरवली तर ते अशक्य आहे. केवळ संतुलितपणे ज्या सेवा जैवविविधतेमुळे मिळतात त्या अमूल्य आहेत. एकच उदाहरण द्यायचे तर ते कीटकाद्वारे होणाऱ्या परागीभवनाचे द्यावे लागेल. कीटकांनी मानवास दिलेली ही देणगी पैसे खर्च करून करवून घ्यायची तर किती रक्कम द्यावी लागेल ? याचा विचारच न केलेला बरा. जैवविविधता विलोपनामध्ये अधिवास बदल किंवा अधिवास नाहीसा होण्याचा मोठा धोका उद्भवतो. सदाहरित जंगलामध्ये होत असलेली वृक्षतोड, लोकसंख्या वाढ, जंगलाच्या जमिनीत खाणकाम, हवा प्रदूषण, मृदा प्रदूषण आणि जल प्रदूषण याशिवाय जागतिक हवामान वाढ या सर्वाचा अधिवास बदलाशी संबंध येतो. अधिवासाचे क्षेत्रफळ आणि त्या अधिवासामध्ये असणाऱ्या जातींची संख्या परस्परांवर अवलंबून आहेत. त्यांतल्या त्यात आकाराने मोठ्या जाती व समुद्र सपाटीलगत असणाऱ्या जंगलातील जाती-अधिवास बदलास संवेदनक्षम आहेत. दक्षिण भारतातील सलग जंगलांचे पट्टे नष्ट झाल्याने पश्चिम घाट जंगलातील हत्ती उन्हाळ्यात पीक क्षेत्रामध्ये घुसतात. ऊस हे त्याना त्यांचे नैसर्गिक खाद्य वाटल्याने ते तेथेच राहतात. त्याना हुसकून लावण्याचा प्रयत्न केल्यास ते परत परत तेथेच येत राहतात. मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्यानंतर पुनर्वनीकरणात अस्तित्वात असलेल्या सर्व वनस्पती परत कधीच लावता येत नाहीत. एकाच प्रकारच्या वृक्षांचे पट्टे लावण्याने त्या परिसरामध्ये असलेली विविधता नष्ट होते. नॅशनल सायन्स फाउंडेशन यानी केलेल्या २००७च्या अभ्यासातून असे समजले की जैवविविधता आणि जनुकीय विविधता यांचा परस्पर संबंध आहे. जातींमधील विविधतेसाठी जातींत जनुकीय विविधता असणे आवश्यक आहे. एका घटकाचा अभाव म्हणजे दोन्हीमधील संतुलन संपणे होय. अशा वेळी परिसरात एकच जाती प्रबळ ठरते. पाळीव प्राण्यांच्या बाबतील हे सहज समजून येते. पशुपालनासाठी राखीव कुरणे म्हणजे फक्त दूध किंवा मांसासाठी जनावरे पाळणे, हाच प्रकार कृषिव्यवस्थेमध्ये घडतो. उत्पादन घटण्याच्या भीतीने दुसरी वनस्पती म्हणजे तण शेतामध्ये वाढू दिले जात नाही, अगदी तसे होय.

पृथ्वीवर एका वेळी सर्वाधिक किती सजीव राहू शकतील, ही पृथ्वी ग्रहाची सजीव धारण क्षमता झाली. उदा.एका हेक्टरमध्ये अधिकतम किती गव्हाचे उत्पादन घेता येईल याची जीवशास्त्रीय मर्यादा गणिताने काढता येते. जाति-विविधता किती असू शकेल, याचा अंदाजही काढता येतो. सागरी सजीवाची विविधता वृद्धिवक्र पद्धतीने तर भूमीवरील सजीवांची विविधता घातश्रेणीने वाढते. एका वैज्ञानिकाच्या मते चतुष्पाद प्राणी आजच्या घटकेला भूप्रदेशावरील ६४ टक्के प्रदेशातसुद्धा पोहोचलेले नाहीत. मानवी हस्तक्षेपाशिवाय चतुष्पाद सजीवांची वाढ अशा पद्धतीने होण्याची शक्यता आहे, की सर्व प्रकारच्या परिसंस्थेमध्ये चतुष्पाद पोहोचतील. जेवढी पूर्वजांची संख्या अधिक तेवढी त्यापासून निर्माण होणाऱ्या पिढ्यांची संख्या अधिक असते. वृद्धीसाठी आवश्यक घटकांचा तुटवडा असल्यास सजीवांची विविधता कमी होते. मानवी हस्तक्षेपामुळे सद्या फक्त १०० वर्षामध्ये इतर सजीवांचा नाश होण्याची शक्यता आहे. मग सांगा भाऊ, मानवाचे अस्तित्व कायम तग धरून राहू शकेल का ? म्हणून माणसा, तू जैवविविधता संरक्षित व संवर्धित कर, अन्यथा तुझा सत्यानाश झालाच म्हणून समज..!



# हर्सूल टी पॉईंट येथे गौतम बुद्धांचा पुतळा बसवावा

## नसता मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही; आंबेडकरवादी संघर्ष समितीचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** हर्सल टी पॉईंट येथे तथागत गौतम बुध्दाचा पुतळाच बसवावा याबाबत मनपा प्रशासक तथा आयुक्त जी श्रीकांत, जिल्हाधिकारी आस्तिककुमार पाण्डेय व मुख्यमंत्री सचिवालय (कक्ष) यांना आंबेडकरवादी संघर्ष समितीच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली. सदरील मागणी पूर्ण न झाल्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही असा इशारा आंबेडकरवादी संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आला आहे. औरंगाबाद हे ऐतिहासिक व पर्यटन स्थळ असून लगतचा परिसर व जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात अजिंठा, वेरुळ व इतर ठिकाणी बुध्द लेणी असून त्या बघण्यासाठी जगभरातून बौध्द व इतर पर्यटक मोठया प्रमाणात येतात. त्या माध्यमातून शासनाला महसूल प्राप्त होत आहे. औरंगाबाद शहर व जिल्हयाला पर्यटन स्थळाचा ऐतिहासिक वारसा लाभला असून बुध्द लेणीमुळे बौध्द राष्ट्राकडून सदरील पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी मोठया प्रमाणात निधी मिळत असतो, म्हणून हर्सल टी पॉईंट येथे आंबेडकरी व बौध्द समाजाच्या वतीने तथागत गौतम बुध्दांचा भव्यदिव्य पुतळा उभारण्यात यावा, अशी मागणी सातत्याने आपल्या प्रशासनाकडे करण्यात येत आहे. यापुर्वीही समितीच्या वतीने सदरील मागणी मान्य करण्यात यावी, याकरीता लोकशाही मार्गाने आंबेडकरी व बौध्द समाजाकडून जनआंदोलन करण्यात आलेले आहे. परंतू, सदरची मागणी अद्यापही मान्य झाली नसून त्या मागणीशी आमची अस्मिता व भावना जोडली आहे. तसेच अलीकडे औरंगाबाद शहरामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे कार्यक्रमासाठी आल असता एक निवेदन त्यांना दिल्यावरुन राजमाता माँ जिजाऊ व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे पुतळे हर्सुल टी पाँईट येथे बसविण्यात येणार असल्याची त्यांनी घोषणा केल्याने आंबेडकरी व बौध्द समाजामध्ये असंतोष पसरला आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी केलेली घोषणा ही निषेधार्ह असून दोन समाजामध्ये तेढ निर्माण करणारी आहे. आम्हाला राजमाता माँ जिजाऊ व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्याबद्दल नितांत आदर आहे. याबरोबरच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व माता रमाई यांचा सदर ठिकाणी पुतळा बसविण्याची घोषणा केली असती तर आम्ही त्याचे स्वागत केले असते. परंतू, सर्वप्रथम तथागत गौतम बुध्दाच्या पुतळयाची मागणी असतांना राजकीय डावपेच म्हणून आंबेडकरी व बौध्द समाजाच्या भावना मा. मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी दुखावल्या आहेत. त्यांचा आम्ही जाहीर निषेध करीत आहोत. त्यांनी या मागणीचा फेरविचार करुन जागतिक वारसा असलेल्या बौध्द संस्कृतीचा ठेवा म्हणून हर्सुल टी पॉईंट येथे तथागत गौतम बुध्दाचा पुतळाच बसविण्याबाबतची घोषणा करावी, नसता आंबेडकरी व बौध्द समाजाच्या वतीने लोकशाही मार्गाने तिव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा समितीच्या वतीने देण्यात येत आहे. या मागणीचे गांभिर्य लक्षात घेवून व आंबेडकरी व बौध्द समाजाच्या भावना समजून आमची मागणी पूर्ण न झाल्यास मुख्यमंत्र्याला महाराष्ट्रात फिरू देणार नाही असा इशारा आंबेडकरवादी संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी निवेदन देताना श्रावणदादा गायकवाड, सुनील वाकेकर, नानासाहेब शिंदे, मनीष नरवडे, वसंतराज वक्ते किशोर गडकर, मिलिंद मोकळे, संतोष मोकळे, संगीताताई भालेराव /जाधव करुणा ताई पाईकडे, बलराज दाभाडे, उत्तम जाधव, नायबराव दाभाडे, राहुल वाडमारे, बाळु वाघमारे, पवन पवार, सुनील अवचरमल, सुनील खरात, नवल सूर्यवंशी, अंकुश शिंदे, बंटी सदाशिवे, राहुल मकासरे, अशोक सोनवणे, सूरज खाडवे, कांतीलाल सोनवणे, भगवान तरटे, प्रवीण बोर्डे, विशाल गवळे, विजय पवार, संदीप अहिरे, सुनील आंबोरे, संजय जाटवे, सुरेश कटारे, लाला बताडे, विलास साळवे, किशोर ससाणे, सचिन गायकवाड, विशाल मोरे, संजय शिरसाट, अक्षय जिनवाल, प्रकाश घोरपडे, सोनू गायकवाड, अलंकार खंडागळे, अमोल भालेराव, सूरज मगरे, राजू म्हस्के, विशाल बनकर, बाबासाहेब सुरडकर, अमोल घोरपडे. करुणा पाटोळे, भारती बनकर, शालिनी नरवडे आदी सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.



# लोकवर्गणीतून काढलेल्या चारीमुळे पाणीप्रश्न मिटेल : सरपंच अनिता माळी

आधुनिक केसरी न्यूज

**दीपक माळी**

**सांगली :** जत पूर्व भागातील माडग्याळ जवळील म्हैसाळ उपकालव्यातून परीसरातील शेतकऱ्यांच्या शेती, जनावरे व पिण्याच्या पाण्यासाठी चार काढून पाण्याची सोय करावी अशी मागणी घेऊन माडग्याळ येथिल शिष्टमंडळ दिनांक ८ मे रोजी जिल्ह्याचे खासदार संजयकाका पाटील व म्हैसाळ योजनेचे कार्यकारी अभियंता सचिन पवार यांची भेट घेतली होती. यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक प्रकाश जमदाडे, मंन्सूर खतीब, माडग्याळ मधून शिष्टमंडळातून सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक विठ्ठल निकम, ग्रामपंचायत सदस्य महादेव माळी सावकार, लिंबाजी माळी, कामाण्णा बंडगर, सेवावर्धिनी संस्था पुणे यांच्यातर्फे जलदुत अर्जून सावंत, बळवंत जाधव, प्रविण सावंत यांनी भेट घेऊन लोकवर्गणी व सेवावर्धीनी संस्था व शेती परीवार संस्था याच्यामार्फत हे काम करणार असल्याचे व त्यासाठी आवश्यक पाटबंधारे विभागाचे नाहरकत दाखला व इतर समस्येबाबत चर्चा केली.

खासदार संजयकाका पाटील व म्हैसाळ योजनेचे कार्यकारी अभियंता सचिन पवार यांच्याशी प्रकाश जमदाडे व माडग्याळमधील शिष्टमंडळाचे सकारात्मक चर्चा झाली होती. माडग्याळ पासून अवघ्या काही अंतरावरून म्हैसाळ उपकालवा गेलेला असताना आजूबाजूच्या शेतकऱ्यांना मात्र शेती व पिण्याच्या पाण्याची ऐन उन्हाळ्यात तुटवडा जाणवत असते. कृष्णा खोरे महामंडळाकडून या कामास मुख्य कालव्यातून चारीद्वारे ओढापात्रातून पाणी सोडल्यास या भागातील लोकवस्तींचा पिण्याचा प्रश्न सुटणार आहे. या साठी चार काढण्याचे काम परीसरातील शेतकरी लोकवर्गणीतून व सेवावर्धीनी संस्था पुणे व शेती परीवार संस्था आटपाडी यांच्या महत्वपुर्ण सहभागातून पुर्ण होणार आहे. चारीद्वारे ओढापात्रात पाणी सोडल्यास या परीसरातील शेकडो एकर शेती ओलिताखाली येणार आहे. त्याचबरोबर माडग्याळ गावाशेजारील सोन्याळ, उटगी या भागातील शेतकऱ्यांनाही याचा फायदा होणार आहे. या भागातील नागरिकांच्या समस्या लक्षात घेता याबाबत खासदार संजयकाका पाटील यांनी अभियंता सचिन पवार यांच्यांशी चर्चा करून लवकरच या कामास परवानगी मिळावी अश्या सूचना केल्या.

म्हैसाळ योजनेचे कार्यकारी अभियंता मा. श्री. सचिन पवार यांनीही या कामास सकारात्मकता दाखवली असून या कामास कृष्णा खोरे पाठबंधारे विभागाकडून हिरवा कंदिल मिळाला आहे. लवकरच सेवावर्धीनी संस्था पुणे, शेती परिवार संस्था आटपाडी व माडग्याळ ग्रामपंचायतच्या लोकवर्गणीमधून हे काम सुरू होणार आहे. त्यामुळे गेल्या अनेक दिवसापासून सरपंच सौ. अनिता माळी ग्रा. प. सदस्य महादेव माळी, पुणे येथिल सेवावर्धीनी संस्था व आटपाठी येथिल शेती परिवार संस्थेच्या प्रयत्नाना यश मिळाले आहे. गेल्या अनेक दिवसापासून ही सेवावर्धीनी संस्था दुष्काळी भागासाठी काम करीत असून जलदुत अर्जून सावंत याच्याकडून या भागात पाणी देण्यासाठी व दुष्काळ दुर करण्यासाठी प्रयत्नशील होती. याबाबत माडग्याळचे सरपंच सौ. अनिता माळी व महादेव माळी यांच्याशी चर्चा संस्थांचा सहभाग व लोकवर्गणीतून ही कामे पुर्ण करण्याचे ठरले होते. सदरचे काम पुर्ण झाल्यास माडग्याळ व त्याखालील गावांना हे वरदान ठरणार आहे. त्यामुळे माडग्याळ मधील शेतकरी सुखावला असून माडग्याळचे लोकनियुक्त सरपंच सौ. अनिताताई माळी, श्री विठ्ठल निकम, महादेव माळी, लिंबाजी माळी, कामण्णा बंडगर, तुकाराम कोरे, यांच्या प्रयत्नांना यश मिळणार आहे.

१) माडग्याळपासून अवघ्या दिड किलोमीटर अंतरावरूनच म्हैसाळचा उपकालवा गेला असला तरी माडग्याळला याचा फारसा उपयोग नव्हता येथिल शेतकऱ्यांना उन्हाळ्यात पिण्यासाठी व पशुधनाच्या पिण्यासाठी पाण्याची कमतरता भासत होती या कामाने या परीसरातील शेतीतर ओलिताखाली येणारच आहे त्याचबरोबर पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही कायमस्वरुपी मिटणार आहे . आमच्याकडून लोकवर्गणीद्वारे व सेवावर्धीनी संस्था व शेती परिवार संस्था मार्फत केल्या जाणाऱ्या कामाला गती देऊन लवकरच हे काम पुर्णत्वास नेले जाईल . महत्वपुर्ण सहकार्य केल्याबद्दल सेवावर्धीनी संस्था व शेती परिवार संस्थेचे आम्ही माडग्याळवासीय आभारी आहोत .

**लोकनियुक्त सरपंच सौ . अनिताताई महादेव माळी, ग्रामपंचायत माडग्याळ**

२) म्हैसाळ उपकालव्यातून चरीद्वारे ओढापात्रातून पाणी सोडल्यास या भागातील शेतकऱ्यांचा तर फायदा होणारच आहे त्याचबरोबर शासनाचे देखिल वर्षाला या भागातील लोकांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी होणारा खर्च राहणार नाही . प्रकाश जमदाडे साहेब यांना घेऊन खासदार श्री . संजय काका पाटील यांच्याशी झालेल्या चर्चेला यश आले असून वर्षानुवर्षे भेडसावणारा पाण्याचा प्रश्न मिटणार आहे .

**विठ्ठल निकम, माजी संचालक, कृषी उत्पन्न बाझार समिती**



# जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा टाकीचे माळीवाडा येथे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**माळीवाडा :** येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा टाकीचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी गावचे प्रतिष्ठित नागरिक चंद्रकांत मोहन हेकडे, सरपंच अनिता सुधाकर हेकडे, उपसरपंच कडूभाऊ कीर्तिकर, ग्रामपंचायत सदस्य कृष्णाभाऊ मुळे, प्रवीणभाऊ बर्डे, धम्माभाऊ गायकवाड, कमलबाई आस्वार, जिजाबाई भगत, मंदाकिनी कीर्तीकर, ग्राम विकास अधिकारी श्री जी. व्ही. हारदे, पाणीपुरवठा अभियंता गायकवाड, ठेकेदार महाजन, प्रतिष्ठित नागरिक सोमनाथ भगत, संदीप भगत, गणेश भगत, नितीन वानखेडे व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्स्लटींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# मिल्लतनगर भागात रस्ते कामांचा शुभारंभ!

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाआभियान अंतर्गत प्रभाग क्रमांक 12 व 19 मिल्लत नगर भागात कॉंक्रिट रस्ता कामाचे सलीम शाह यांचेहस्ते शुभारंभ करण्यात आले. धुळे शहर विधानसभा मतदार संघाचे आमदार फारुख शाह यांनी कामाचा धडाका सुरू केला आहे. राज्य शासनाच्या विविध योजनांचा अक्षरशः पाऊसच धुळे मतदार संघात पाडला आहे.शहरातील विविध भागात एक दिवसाआड कामांचा शुभारंभ आमदारांकडून केला जात असल्याने धुळेकर जनता सुखावत आहे. नागरिकांनी मागणी करायची आणि आमदारांनी काम करायचे असा नित्यक्रम ठरलेला आहे. मिल्लतनगर मधील नागरिकांनी केलेल्या मागणीनुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाआभियान अंतर्गत प्रभाग क्रमांक 12 व 19 मिल्लत नगर भागात कॉंक्रिट रसत्यासाठी ५० लक्षचा निधी मंजूर करण्यात आला. सर्व प्रशासकीय. प्रक्रिया पार पडून आ.सलीम शाह यांचे हस्ते प्रभाग क्रमांक 12 व 19 मिल्लत नगर भागात विविध ठिकाणी कॉंक्रिट रस्ता तयार करणे कामाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी सलीम शाह यांचे सोबत मुक्ती कासिम जीलानी, आमिर पठाण, मौलवी अकीम, साजीद साई, निजाम सैय्यद, इब्राहीम पठाण, वसिम अक्रम, शोएब मुल्ला, माजीद पठाण, हलीम शमसुद्दिन शहजाद मंसुरी, इकबाल शाह, जमील खाटीक, शाहिद शाह, मुद्दसार शेख, जियाउद्दिन मिर्झा, आलिम शेख, सलमान अन्सारी, सऊद आलम, हबीब अन्सारी, अल्ताफ पठाण, अलिमोद्दिन शेख,साजीद पठाण, कैसर सैय्यद आदी उपस्थित होते. रस्त्याच्या कामास सुरुवात झाल्याने मिल्लत नगर परिसरातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

# तापमान वाढीसह पावसाचेही ढग

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** आजपासून "नवतपा"ची सुरुवात झाली आहे. तापमान पुन्हा एकदा ४३ अंश सेल्सिअसवर गेले असताना पावसाचे ढगदेखील आहेत. त्यामुळे यावर्षी "नवतपा"चा ताप फारसा वाढणार नाही, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. मे महिन्याची अखेर म्हणजे "नवतपा"चा ताप. या काळात तापमानाची सर्वोच्च नोंद होते. आजवर हीच स्थिती राहिली आहे. गेल्या दोन-चार वर्षांत हवामानाचे चक्र पालटले आहे. यावर्षी हवामानात खूप जास्त बदल झाले. ज्या महिन्यात तापमानाचा पारा चढलेला असतो, त्याचवेळी सर्वत्र गारपीटीसह पाऊस झाला. आताही तापमान ४५ अंश सेल्सिअसवर गेले असताना पावसाचे ढग डोकावू लागले आहेत. यंदा २२ मेपासून सुरू होत असलेल्या नवतपादरम्यान विदर्भ व नागपुरातील तापमानात फारशी वाढ होणार नसल्याचे संकेत आहेत. प्रादेशिक हवामान खात्यानुसार, या काळात तापमान ४२ ते ४३ अंशांच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. ज्येष्ठ महिन्यात सूर्य रोहिणी नक्षत्रात प्रवेश करतो. यावेळी सूर्य १५ दिवसांसाठी रोहिणी नक्षत्रात असतो. यातील सुरुवातीचे नऊ दिवस सर्वाधिक तापमानाचे असतात, अशी धारणा आहे.

# उसणे पैसे मागण्यासाठी गेलेल्या इसमाविरुद्ध विनयभंगाची तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पोलीस ठाण्यात उसने पैसे मागण्यासाठी गेलेल्या इसमाविरुद्ध एका महिलेने केली विनयभंगाची तक्रार याची सविस्तर माहिती अशी आहे की, फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील हेमंत उर्फ शंकर नारायण वाघ हे फुलंब्री येथे राहणाऱ्या एका विधवा महिलेच्या घरी स्वतःच्या पत्नीला सोबत घेऊन उधारी मागण्यासाठी गेले असता त्या महिलेने हेमंत वाघ यांच्या विरोधात फुलंब्री पोलीस ठाण्यात विनयभंगाची तक्रार दिली आहे. या विनयभंगाच्या तक्रारीमुळे घाबरलेल्या हेमंत वाघ यांनी औरंगाबाद ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे , या तक्रारीत असे म्हटले आहे की, दि. 22 मे 2023 रोजी मी व माझी पत्नी फुलंब्री येथे राहणाऱ्या एका विधवा महिलेकडे उसने दिलेले 85 हजार रुपये मागण्यासाठी गेलो असता. त्या विधवा महिलेने माझ्या विरोधात फुलंब्री पोलीस ठाण्यात खोटी विनयभंगाची तक्रार केली. सदरील विधवा महिलेचा पती माझा मित्र असल्यामुळे व त्याचा 2020 ला दीर्घ आजाराने मृत्यू झाल्यामुळे आणि एम्स हॉस्पिटल औरंगाबाद येथे त्यांची फसवणूक करून जास्तीचे पैसे घेतल्यामुळे मी त्यांच्यासाठी वारंवार तक्रारी व अर्ज फाटे करत होतो. तसेच या विधवा महिलेच्या नवऱ्याच्या नावावर असलेली जमीन त्यांच्या मुलांच्या नावावर फेरफार करण्याससुद्धा मीच पुढाकार घेतलेला आहे. यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी यांना हात ऊसणे 85 हजार रुपये रोख रक्कम दिलेले आहे. तेच उसने पैसे मागण्याकरिता मी माझ्या बायकोला सोबत घेऊन यांच्या घरी गेलो असता आम्ही दोघे नवरा बायको त्यांच्या घरासमोर उभे होतो व दिलेले पैसे आम्हाला परत द्या, अशी मागणी केली असता यांनी माझ्याविरोधात दिनांक 9 मे रोजी फुलंब्री पोलीस ठाण्यात नको ते आरोप घेऊन विनयभंगाची तक्रार केली आहे. तरी माननीय साहेबांनी या प्रकरणात स्वतः चौकशी करून योग्य न्याय देण्यात यावा, असे निवेदनात हेमंत वाघ यांनी पोलीस अधीक्षक औरंगाबाद ग्रामीण यांना दिले आहे.

# सिरसीकर, मेहता यांना आदर्श सेवा गौरव पुरस्कार




आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात सेवापथ सोशल फाउंडेशन तर्फे सुरेश सिरसीकर आणि अपर्णा मेहता यांना ' आदर्श सेवा गौरव पुरस्कार ' सहाय्यक पोलीस आयुक्त बालाजी सोनटक्के व डॉ. जीवन राजपूत व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थिती सुहास न्यायाधीश, सुरेश जुये, अमरपाली तायडे, राजीव भिसे, डॉ. प्रा. सुनील मतकर, सेवापथ सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अकबर अख्तर शेख उपस्थित होते.

सुरेश सिरसीकर होल्डिंग हॅन्ड्स बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आहे तर अपर्णा मेहता या होल्डिंग हँड्स या संस्थेच्या सचिव आहेत. होल्डिंग हँड्स ही संस्था आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, समाज, महिला सबलीकरण, सामाजिक बांधिलकी असणारे सर्व उपक्रम देश पातळीवर राबवित असते. या पुरस्काराचे कौतुक होत आहे.

# कन्हैया आश्रमात बाळ गोपाळांबरोबर हरीण खेळते पावली

आधुनिक केसरी न्यूज

**जयप्रकाश बागडे**

**बालमटाकळी :** साध्वी ह.भ. प. शितलताई देशमुख यांच्या कन्हैय्या आश्रमातील हरणाचे पाडस बालगोपाळांसोबत हरिपाठामधे आनंदाने रोज निर्भयपने नाचत बागडत पाऊले खेळत असल्याचा व्हिडिओ सध्या महाराष्ट्रभर व्हायरल होत असल्याने या बालमटाकळीतील कन्हैया आश्रमाकडे अनेक भाविक भक्त हरिपाठामध्ये हरीण कसे पावले खेळतात ते पाहण्यासाठी येत आहेत, अहमदनगर जिल्ह्याच्या शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथील साध्वी शितलताई देशमुख यांचे वडील रतनराव देशमुख व बंधू विठ्ठल व बापू यांनी अधिक माहिती देताना म्हटले की, कन्हैया आश्रमाच्या साध्वी कीर्तनकार शितलताई देशमुख यांनी लहानपणापासूनच प्रपंचाचा त्याग करून संन्यासी मार्ग निवडला, त्यांनी जवळपास १२ वर्ष हिमालयात अनेक साधूंच्या सहवासात साधना करून ज्ञान प्राप्त करून गेल्या तीन चार वर्षांपासुन गावात व परिसरात किर्तन... प्रवचन... संस्कार शिबिर... सप्ताह.. यांच्या माध्यमातून भक्ति मार्गाचा प्रचार / प्रसार करत अनेक थोरा मोठ्यांना सन्मार्गावर चालण्यासाठी प्रवृत्त करुन परिसरातील अनेक लहान मुलांकडून त्यांनी भगवदगीता सह अनेक संस्कृत पाठ मुखोदगत करुन घेतले आहे, भजन सम्राट रामेश्वर महाराज देशमुख हे शितल महाराज देशमुख यांचे बंधू आहेत, त्यांच्या विद्वत्तेमुळे कन्हैया आश्रमासह बालमटाकळीचे नाव महाराष्ट्रभर सांप्रदायिक क्षेत्रात गाजत आहे.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# वीजग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्यासह महसूलवाढीकडे लक्ष द्या

## महावितरणचे संचालक संजय ताकसांडे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वीजग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्यासह महसूलवाढीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. सुरळीत वीजपुरवठा, अचूक बिलिंग व वापरलेल्या प्रत्येक युनिटची वीजबिल वसुली केली तरच महावितरण प्रगतिपथावर जाईल. त्यासाठी महावितरणच्या सर्व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन महावितरणचे संचालक (संचालन) संजय ताकसांडे यांनी केले. महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेच्या वतीने तांत्रिक कामगारांची कार्यशाळा व ईद मिलन समारंभात ते बोलत होते.

मौलाना आझाद संशोधन केंद्रात झालेल्या या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब भाकरे होते प्रमुख पाहूणे म्हणून मुख्य अभियंता अविनाश निंबाळकर, अधीक्षक अभियंते प्रकाश जमधडे, प्रवीण दरोली, संजय सरग, आर. पी. चव्हाण, कार्यकारी अभियंते प्रेमसिंग राजपूत, महेश पाटील, दीपक सोनोने, योगेश देशपांडे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, सरचिटणीस सय्यद जहिरोद्दिन, कार्यकारी अध्यक्ष आर. पी. थोरात, उपसरचिटणीस कैलास गौरकर, राधेशाम शडमल्लू, श्रावण कोळनूरकर, शिरीष इंगोले, अजिज पठाण, ताराचंद कोल्हेमामा, उदय मदूरे, बी. डी. पाटील, संतोष वाघमारे, जाफर पठाण यांची मंचावर उपस्थिती होती.

ताकसांडे म्हणाले की, राज्यातील तीन कोटी ग्राहकांना वीजपुरवठा करताना महावितरणचे कर्मचारी चांगले काम करत आहेत. विशेषतः कोरोनाच्या जागतिक संकटात तसेच चक्रीवादळातही वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी वीज कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट कार्य केलेले आहे. महावितरणवर वेगवेगळ्या बँकांचे हजारो कोटींचे कर्ज आहे. तसेच विविध वर्गवारीतील ग्राहकांकडे प्रचंड मोठी थकबाकी आहे. यामुळे महावितरण आर्थिक संकटात आहे. या संकटातून महावितरणला बाहेर काढण्यासाठी ग्राहकांनी वापरलेल्या विजेच्या प्रत्येक युनिटची वसुली झालीच पाहिजे, तसेच ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी सर्वतोपरी उपाययोजना आखाव्या लागतील.



प्रास्ताविकामध्ये सरचिटणीस सय्यद जहिरोद्दिन म्हणाले की, संचालक (संचालन) ताकसांडे हे कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत सकारात्मक असतात. तांत्रिक कामगारांचे प्रश्न त्यात यंत्रचालकांची ॲनॉमली, मराठवाड्यातील यंत्रचलाकांचा बंद झालेला अतिकालीन कामाचा मोबदला, प्रधान तंत्रज्ञ, मुख्य तंत्रज्ञ यांना महापारेषणप्रमाणे यंत्रचालक संवर्गात जाण्याचा मार्ग खुला करणे, प्रधान तंत्रज्ञांना पेट्रोल भत्ता १३ लिटर देणे, २०० उपकेंद्रांचा एम.पी.आर. देऊन कायम कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे आदी मागण्यांवर दि. २४ मे रोजी मुख्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचे संचालक संचालन यांनी मान्य केले असे सांगितले. प्रसंगी कैलास गौरकर, राधेशाम शडमल्लू, उदय मदूरे, शिरीष इंगोले यांची समायोचित भाषणे झाली, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावण कोळनूरकर यांनी केले तर आभार आर. पी. थोरात यांनी मानले.



# एकेरी कॅरम स्पर्धेत सुनिल वाघ प्रथम, तसेच कै. घनश्याम सहस्त्रबुद्धे स्मृती चषक प्राप्त

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** एरंडवणे जेष्ठ नागरिक संस्था आयोजित एकेरी कॅरम स्पर्धेच्या रविवारी झालेल्या अंतिम फेरीत कॅरम पटूनी अटीतटी च्या सामन्यात रोमहर्षक खेळ खेळून सुनील वाघ यांनी विजय मिळविला व स्पर्धेचा कै.घनश्याम सहस्त्रबुद्धे स्मृती चषक व रुपये 3 हजार चे रोख पारितोषिक मिळविले व अजिंक्य राहिला.स्पर्धा पंच विलास सहस्त्रबुद्धे यांनी पाहिले आठ विजेते घोषित केले ते असे १) सुनील वाघ -प्रथम विजेता,-चषक व रोख रुपये ३ हजार २) सुधाकर चव्हाण -द्वितीय विजेता- चषक व रुपये २ हजार रोख, ३) राजाभाऊ ठाकूर -तृतीय विजेता -चषक व रुपये १ हजार रोख, ४)नूर मोहम्मद शेख-चतुर्थ विजेता - चषक व रूपये १ हजार रोख, ५)बाळकृष्ण लोहोकरे, पाचवा विजेता - चषक व रुपये ६०० रोख, ६) भूषणसिंग भोला -सहावा विजेता- चषक व रुपये ५०० रोख, ७)प्रदीप जाधव - सातवा विजेता- चषक व रुपये ३०० रोख ८) धनंजय लाटकर -आठवा विजेता - चषक व रुपये २०० रोख. बांधकाम व्यावसायिक कोटीभास्कर गृप चे दिलीप कोटीभास्कर हे प्रमुख पाहुणे होते त्यांच्या हस्ते विजेत्यांना कै. घनश्याम सहस्त्रबुद्धे स्मृती चषक प्रदान करण्यात आले तसेच रोख पारितोषिके देखील देण्यात आले.दिलीप कोटीभास्कर ह्यावेळी म्हणाले,सामाजिक व्यवस्थेमध्ये जेष्ठ नागरिकांचे कार्य अमूल्य असून अत्यंत महत्वाचे आहे. वयोमर्यादा असूनही क्रीडा स्पर्धा व अनेक कार्यक्रम जेष्ठ नागरिक संस्था यशस्वी घेत असते हे सर्वांना प्रेरणादायी आहे. या पुढे एरंडवणे जेष्ठ नागरिक संस्थेतर्फे घेण्यात येणाऱ्या स्पर्धांना आमच्यातर्फे सहकार्य केले जाईल असे आश्वासन दिलीप कोटीभास्कर यांनी यावेळी दिले. जेष्ठ नागरिकांसाठी या कॅरम एकेरी स्पर्द्धामध्ये पुणे शहरातील व पिंपरी चिंचवड विभागातील ११२ खेळाडूंनी भाग घेतला. त्यात १४ महिला खेळाडू होत्या.स्पर्धा आंतरराष्ट्रीय नियमानुसार व खेळीमेळीच्या वातावरणात संस्थेच्या कार्यालयातील सभागृहात घेण्यात आल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत पुराणिक हे होते.पाहुण्यांचा परिचय व उपस्थितांचे स्वागत श्रीकांत पुराणिक ह्यांनी केले.सूत्रसंचालन अजित गोखले यांनी केले. स्पर्धेची माहिती शिरीष जोशी ह्यांनी दिली. स्पर्धा यशस्वितेसाठी स्पर्धा प्रमुख शिरीष जोशी,स्पर्धा संयोजक अभय अटकेकर,मुख्य पंच विलास सहस्त्रबुद्धे, सतीश सहस्त्रबुद्धे, उर्मिला शेजवळकर, माधव तीळगुळकर, जयंत मुळ्ये, संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत पुराणिक, कार्याध्यक्ष अजित गोखले ह्यांनी परिश्रम घेतले.

# महाराणा प्रतापसिंह यांना सायकलिस्ट व स्वीमिंग ग्रुपच्या वतीने अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** हिंदवी सूर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या ४८३ व्या जयंती निमित्त शहरातील सायकलिस्ट व जलतरण (स्वीमिंग) ग्रुप च्या वतीने सोमवार(ता.२२) रोजी पोलीस निरीक्षक संजय लोहकरे व जेष्ठ नागरिक तथा माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांच्या वतीने महाराणा प्रतापसिंह यांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार करून अभिवादन करण्यात आले, ग्रुप च्यावतीने धोंडीरामसिंह राजपूत यांनी सकल राजपूत बंधू -भगिनी यांना जयंती निमित्त शुभेच्छा देऊन शहर वाशीयांना"सायकल चालवा-आयुष्य वाढवा"सायकल चालवा-निरोगी रहा "तसेच पोहण्याचा करा सराव-जीवनातिल दूर करा तणाव"असा संदेश देऊन हिंदवी सूर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या राष्ट्रनिष्ठ व राष्ट्रभक्ती, मातृभूमी प्रेम तसेच स्वाभिमानाने जगण्याचा संदेश दिला. नंतरही सायकल फेरी शहराच्या विविध भागातून काढत वरील संदेश शहर वाशीयांना ही दिला. या समयी सायकलिस्ट व स्वीमिंग ग्रुप चे सदस्य उपस्थित होते.



# दुकानदारांच्या आक्रमक पवित्र्यापुढे अप्पर तहसीलदारांची माघार

आधुनिक केसरी न्यूज

**जत/ सांगली :** जत तालूक्यातील गुड्डापूर येथे श्री दानम्मादेवी मंदीर परीसरातील अतिक्रमण हटवण्यासाठी मोठ्या फौजफाट्यासह आलेले संखचे अप्पर तहसिलदारांना व्यवसायिक बंधूच्या विरोधानंतर अखेर माघार घ्यावी लागली. मंदीर परीसरात नारळ वगैरे विक्री करून आपले उदरनिर्वाह करत असल्याने व संपूर्ण घर त्याच व्यवसायावर अवलंबून असल्याने व्यापारी बंधू आक्रमक होते. संखचे अप्पर तहसिलदारांकडून केवळ चारच दुकानदारांवर कारवाई करणार असल्याचे समजल्याने दुकानदार महिला व पुरूषांनी अतिक्रमण काढणार असाल तर सर्व काढा अन्यथा आमच्यावर तेवढेच कारवाई करून आमच्यावर उपासमारीची वेळ आणू नका अशी विनंती केली. मात्र अप्पर तहसिलदार चारच अतिक्रमण काढण्यावर ठाम राहिल्याने काही काळ तणावाचे वातावरण झाले. शेवटी महिला व पुरूष दुकानदांराच्या आक्रमक पवित्र्यामुळे अप्पर तहसिलदारांना माघार घ्यावी लागली व देवस्थान ट्रस्ट व दुकानदारांनी चर्चेतून तोडगा काढावा असे सुचवून तहसिलदार पोलिस फौजफाटा निघून गेले. प्रत्यक्षात दुकानदार बांधवाचे म्हणणे आहे की मुळात त्यांची दुकाने ही देवस्थान जागेत नसून महाराष्ट्र शासनाची ग्रामपंचायत देखरेखीखाली देण्यात आलेली गायरान जमिन आहे, आणि त्यांची दुकाने असलेल्या ठिकाणी देवीच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तांना कोणत्याही प्रकारचा अडथळा नसताना केवळ चार दुकानदारांवर कारवाई करत स्थानिक दुकानदारांना त्रास देण्यासाठी संख अप्पर तहसिलदारांना चुकीची माहिती देऊन कारवाईसाठी दबाब आणण्याचे काम सुरू आहे. यावेळी दुकानदारांनी सर्व अतिक्रमण हटवत असाल तर कारवाई करण्यास काही हरकत नसल्याचे ठाम पवित्रा घेतला. दुकानदारांचा आक्रमक पवित्रा व वस्तूस्थिती पाहून अखेर संख अप्पर तहसिलदारांनी देवस्थान ट्रस्ट व दुकानदारांनी बसून चर्चा करून विषय संपवावा असे सांगून निघून गेले.

1) गुड्डापूरातील केवळ चार अतिक्रमण काढण्यास मोठ्या फौज-फाट्यासह संखचे अप्पर तहसिलदार हजर झाल्याने कुतूहल व्यक्त केले जात होते . अप्पर तहसिलदार केवळ राजकिय दबावात कारवाई करत असल्याची चर्चा सर्वत्र सुरू होती .
2) अतिक्रमण झालेली जागा नेमकी कोणाची याबाबत निश्चीत माहिती नसावी हाच महत्वाचे मुद्दा ठरला होता . देवस्थान कमिटीकडून अप्पर तहसिलदारांना देवस्थानच्या जागेत अतिक्रमण असून त्याच्यावर कारवाई व्हावी असे अर्ज करण्यात आले आहे तर व्यवसायिक बंधूचे म्हणणे आहे की सदरची जागा ही देवस्थानची नसून ग्रामपंचायतच्या ताब्यात असलेली गायरान जमिन आहे . तर प्रत्यक्षात त्या जागेत ग्रामपंचायतच्या चालू सदस्य व सरपंचाच्या नातेवाईकांचीच अतिक्रमणे आहेत .

# जान्हवीताई सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त ह.भ.प. ऋतुजाताई सांगळे यांचे कीर्तन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरात कु.ह.भ.प. जान्हवीताई सोनवणे यांच्या अभिष्ठाचिंतन सोहळा निमित्त दि.२८/५/२३ रविवार रोजी कु.ह.भ.प.ऋतुजाताई सांगळे नांदगावकर यांचा जाहीर किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.तर गाणकोकीळी ह.भ.प.प्रेरणाताई येलगटे लातूर यांची उपस्थिती राहणार आहे.या किर्तनाचा कार्यक्रम तिरुपती बॅक समोर,मेन रोड सोयगाव येथे आयोजित करण्यात आला आहे. अनेक ह.भ.प.कु.जान्हवीताई



सोनवणे हे वयाने लहान असून आपल्या बऱ्याच किर्तनातून भक्तीचा प्रचार केला.ह.भ.प.कु.जान्हवीताई सोनवणे यांच्या २८ मे रोजी होत असलेल्या वाढदिवसाचे औचित्य साधून ता.२८ रोजी सोयगाव आहे. कु.ह.भ.प.जान्हवी सोनवणे यांचे नेहमी कार्य वृद्धाश्रमातील वृद्धांना गोड जेवण व मिठाई वाटप करणे, व व्यसनमुक्ती वर आधारित जाहीर कीर्तन | असे सामाजिक उपक्रम नेहमी राबवितात सोयगाव गावांसहित पंचक्रोशीतील नागरिक, माता-भगिनी व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने या जाहीर कीर्तनास उपस्थित रहावे असे आवाहन कु.ह.भ.प.जान्हवी सोनवणे यांनी केले याप्रसंगी श्री महामुनी अगस्ती महाराज वारकरी शिक्षण संस्था सोयगाव यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे.